# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २९/०९/२०११**

आज गुरुवार दि. २९/०९/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. १६/०९/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २७) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २८) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २९) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३४) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३५) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३७) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३८) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३९) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४१) | वर्षा भानुशाली | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४३) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४४) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४५) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४६) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४७) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४८) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४९) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५०) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५१) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५२) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५४) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५५) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५६) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५७) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५८) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५९) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६०) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६४) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६५) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६६) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६७) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६८) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६९) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ६) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ७) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ९) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| १०) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ११) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| १२) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| १३) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| १४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार, दि. २९/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. १६/०९/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. आजच्या सभेसाठी प्रश्नोत्तरे नाहीत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, एक गोषवारा आहे तो वाचते. महानगरपालिकेचे सन्मा स्विकृत सदस्य श्री. परशुराम दामोदर पाटील ह्यांचे दि.२०/०८/२०११ रोजी निधन झालेले आहे. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर नवीन नामनिर्देशित सदस्याची नेमणूक उर्वरित कालावधीसाठी होणे आवश्यक आहे.

कै. परशुराम दामोदर पाटील यांची नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमणुक संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे करण्यात आलेली होती. श्री फ. ब. खान उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या दि. २०/१०/२००८ च्या पत्रानूसार कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागेवर निवृत्त झालेला सदस्य ज्या पक्षाचा असेल त्याच पक्षाच्या सदस्यास नामनिर्देशित करण्यात यावे असे कळविले आहे. करिता रिक्त झालेल्या जागेवर नवीन नामनिर्देशित सदस्याची नेमणुक करण्याकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या वेळेत संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे गटनेता श्री. शफिक अहमद सादत खान यांनी श्री. हंसु कमलकुमार पांडे यांची नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमणूक होणेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेले आहे.

तरी नामनिर्देशित सदस्य म्हणून श्री. हंसु कमलकुमार पांडे यांची उर्वरीत कालावधीसाठी नेमणुक केलेची घोषणा करीत आहे.

सही/-
महापौर तथा पिठासिन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर :-**

श्री. हंसुकुमार पांडे यांचे नाव घोषित झालेले आहे याला माझी मान्यता आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मला "क" अंतर्गत एक प्रस्ताव ठेवायचा आहे मला आपली परवानगी पाहिजे. मा. महासभा दि. २९/०९/२०११ समावेशक आरक्षण "क" अंतर्गत विषय घेणे.

**जुबेर इनामदार :-**

विषयपत्रिकेवरचे विषय संपल्यानंतर तो विषय आहे.

**शरद पाटील :-**

मी अनुमती मागतो आहे. मी फक्त विषय वाचतो. मौजे नवघर सर्व्हे क्र. २२२, २२२(अ) आरक्षण अंतर्गत १४१ सदनिकांपैकी धोकादायक इमारतीमधील नागरीकांना राहण्याकरीता तात्पुरते घर उपलब्ध करुन देणेबाबत.

**नगरसचिव :-**

२(के) खाली हा प्रश्न मांडलेला आहे. सभागृहात तीन चतुर्थांश सदस्यांची मान्यता असेल तर तो विषय शेवटी घेण्यात येतो. तशी सभागृहाची मान्यता आहे का?

**मा. महापौर :-**

विषयपत्रिकेवर विषय नसल्यामुळे घेता येत नाही.

**नगरसचिव :-**

या प्रस्तावाला मान्यता असेल त्यांनी हात वर करावे. पंधरा लोक आहेत. बाकीचे विरोधात आहेत का?

**शरद पाटील :-**

विरोधात आहेत असे मतदान घ्या कोण तटस्थ असतील तर समजेल.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, जेवढ्या लोकांनी हात वर केले, तेवढ्या लोकांमध्ये घेता येते का ते पहिले सांगा.

**नगरसचिव :-**

विरोधात कोण आहेत त्यांनी हात वर करावे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, याला विरोधाची गरज काय आहे? त्यांची मान्यता नसेल तर तुम्ही मतदान कसे घेणार?

**नगरसचिव :-**

तीन चतुर्थांश सभागृहाची मान्यता असेल तरच तो विषय घेतला जातो. प्रस्ताव घेण्याकरीता मान्यता आहे का?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, माझी आपणाला विनंती आहे की, या प्रकरणाची सविस्तर माहिती प्रशासनाकडुन घ्यावी. आपले हाऊस फॉर डिसहाऊस रुम किती आहेत त्याची पहाणी करावी किती हस्तांतरीत केले आणि आपल्याकडे सद्यस्थितीत किती आहेत?

**शरद पाटील :-**

श्री. शशिकांत भोईर जे बोलतात हा तोच विषय होता तो घेण्यासाठी काही हरकत नव्हती.

**भगवती शर्मा :-**

इस शहर के अंदर ६६ इमारत धोकादायक है।

**मा. महापौर :-**

हा विषय आल्यानंतर मा. महासभेतील सर्व नगरसेवकांनी जवळ जवळ १४ मते बाजूने आणि विरोधात ४३ मते पडल्यामुळे हा प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आल्या आहेत. पहिली लक्षवेधी श्रीम. प्रभात पाटील यांची आहे. दुसरी लक्षवेधी श्री. मदन उदितनारायण सिंह यांची आहे. पहिल्या लक्षवेधीचा विषय आहे, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील औद्योगिक गाळे धारकांविषयी लक्षवेधी आहे. दुसरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील चौपाटीचे भाडे आकारण्याबाबत. दोन्ही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सुपूर्द करतो.

**मा. महापौर :-**

श्रीम. प्रभात पाटील यांची लक्षवेधी स्विकारण्यात आलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर पूर्वेला लोकांना सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी जागा नाही. म्हणजे हा विषय आपल्याला योग्य वाटत नाही का? लोकांनी सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम कुठे करायचे? म्हणजे या विषयाचे महत्व नाही का? आज सहा महिने झाले, तिकडे कार्यक्रमास बंदी आणलेली आहे त्याबाबत आपल्याला काही विचारात घ्यायचे नाही का? आपण मा. महासभा कशासाठी घेतो? लोकांसाठीच ना? मग जो लोकांचा विषय आहे, लोकांचा प्रश्न आहे तो तुम्ही का घेत नाही? आपले याच्याबाबत काय म्हणणे आहे?

**मा. महापौर :-**

या ठिकाणी आमचे सर्वांचे एकच मत आहे की, आपण नको तो विषय घेऊन या ठिकाणी मोर्चे बांधणी केली तुम्ही जनतेला भडकविण्याचे काम चालू केलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कोण म्हणतो जनतेला भडकविण्याचे काम चालू केले आहे? तुम्ही जनतेला विचारा की, जनता काय म्हणते?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आत्ता नवरात्री उत्सव सुरु झाला तरी.......

**मदन उदितनारायण सिंह :-**

तुम्ही रामलीलाला परवानगी देत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

त्याच्याबद्दल प्रशासनाचा काहीतरी निर्णय झाला असेल त्यांनी माहिती द्यावी.

**प्रभात पाटील :-**

श्री. हंसुकुमार पांडे यांची नियुक्ती केली. त्यांना सभागृहात बोलवणे वगैरे काही प्रकार आहे की नाही?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, यांचा जो प्रश्न आहे, त्याच्याबद्दल प्रशासनाची जी भुमिका आहे ती तरी आपण सभागृहाला सांगावी. नवरात्री उत्सव सुरु झाला अजून परवानग्या मिळाल्या नाहीत. मग कार्यक्रम कुठे करायचे ते तरी लोकांना सुचवा. प्रशासनाने पूर्ण उत्तर मग त्या लक्षवेधीवर तुम्ही व्यवस्थित चर्चा करा.

**मा. महापौर :-**

श्रीम. प्रभात पाटील यांची लक्षवेधी वाचावी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपले महाराज कुमारस्वामी यांना अमेरीकेच्या सिनेटमध्ये अमेरीकेने स्थान दिले आहे पण आपल्या मिरा भाईंदरच्या सत्ताधाऱ्यांनी हिंदू धार्मिक कार्यक्रमांना बंदी आणली आहे म्हणजे काय?

**प्रभात पाटील :-**

सभा कोणत्या प्रकारे चालू आहे तुम्ही लक्षवेधी वाचा.

**नगरसचिव :-**

लक्षवेधी वाचतो. मिरा भाईंदर गांव हे ग्रामपंचायत काळापासून औद्योगिक वसाहत म्हणून उदयास आले. तत्कालिन जिल्हा परिषद सदस्यांनी उद्योजकांना उद्योग धंदयांसाठी काही पायाभूत सुविधा निर्माण करुन देऊन लघुउद्योग हया परिसरात आणले. त्यामुळे स्थानिकांना नोकऱ्या मिळाल्या तर जमिन धारकांना जमिनीचा मोबदला मिळाला आणि गावाचे रुपांतर शहरात झाले. ग्रामपंचायतीची नगरपालिका झाली आणि आता नगरपालिकेची महानगरपालिका झाली.

१९७० च्या सुमारास उभी राहिलेल्या औद्योगिक शेड्स आज मोडकळीस आल्या आहेत. तर काही ठिकाणी रस्ते उंच झाल्यामुळे गाळे खाली गेले आहेत. त्यामुळे पावसाळयात पाणी भरुन काम ठप्प होणे किंवा शॉर्ट सर्किटने अपघात होणे हा नित्याचा प्रकार झाला आहे.

त्यामुळे उंची वाढविण्यासाठी किंवा रिपेअरींगसाठी गाळेधारक आपल्याशी संपर्क करतात. आपण अटी-शर्ती घालून किमान फी आकारुन त्यांना परवानगी देतो. काही वेळा गाळेधारक एखादा पुढारी किंवा महापालिका अधिकारी यांना हाताशी घेऊन परवानगीच्या भानगडीत न पडता अनधिकृतपणे काम करतो. पंरतु परवानगी घेऊन काम करीत असलेला गाळेधारक अटी-शर्तीचे पालन करतोच असे नाही. प्रशासनाचे देखील त्याकडे बारकाईने लक्ष नसते. अनधिकृत काम करणा-यांचे पण तेच होते.

एकंदरीत औद्योगिक वसाहती त्यांचे महत्त्व आणि त्यांच्या समस्या हया गोष्टींबाबत आपले प्रशासन म्हणावे तितके गंभीर नाही असे खेदाने म्हाणावे लागते. हया उद्योगधंदयांनी मिरा भाईंदर शहराला स्वतःची वेगळी ओळख दिली. गावांचे रुपांतर एका मोठया शहरात झाले. जकातीच्या रुपाने तत्कालिन नगरपालिका आणि त्यानंतर महापालिकेला सर्वाधिक महसूल उद्योगांनीच मिळवून दिला. आतासुध्दा हया उद्योगधंदयांच्या माध्यमातून ख.ए.ट्र. साठीचा मोठा हिस्सा आपणास मिळतो आहे. औद्योगिक कर आकारणीतून टॅक्स आकारणीचा मोठा निधी मिळत आहे. असे असताना आपण त्यांना कोणत्या सोयी-सुविधा देतो हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. उलट हे उद्योजक जेव्हा जेव्हा आपल्याकडे काही मागण्या घेऊन येतात तेव्हा आपण त्यांच्यावर कारवाईचे हत्यार उपसतो.

गोडदेव फाटक ते काशीमिरा नाका हया परिसरात पूर्वी ऑल स्टिल, झंकार, जय जवान जय किसान, पुट्टा कंपनी हयासारख्या मोठ-मोठया कंपन्या कार्यरत होत्या. त्या कुठे गेल्या? का गेल्या? याचाही विचार होणे गरजेचे आहे. जकातीच्या भितीपोटी इथले बरेचसे उद्योग हयापूर्वी आपल्या शहरातून हद्दपार झाले आहेत. त्याचा फटका आपल्या तिजोरीवर पडलेला आपण पाहिला आहे. त्याचवेळी वापी/गुजरातने त्यांना जवळ घेऊन स्वतःचा विकास साधला आहे. हया गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते.

वाहून गेली ती गंगा आणि राहिले ते तिर्थ, असे समजून सध्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उभ्या असलेल्या उद्योग-धंदयांसाठी आपले स्वतंत्र धोरण अवलंबणे मला गरजेचे वाटत आहे. स्टिल व्यवसाय, रंगांचे कारखाने म्हणून शासनाच्या भूगोलाच्या पुस्तकात मिरा भाईंदर शहराची ओळख दिलेली आहे. ती पूसू नये असे आपणांस वाटत असेल तर आपल्या तिजोरीशी संबंधित मोठा घटक म्हणून हया विषयाकडे आपण गांभीर्याने पहावे. हया उद्योगाच्या आपल्याकडून असलेल्या आशा-अपेक्षा जाणून घेऊन आपण त्या कशा सोडवू शकतो, हया संबंधी माहिती घेऊन हया विषयाची तड लावावी हीच अपेक्षा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मला वाटते या सभागृहातील श्री. परशुराम पाटील हे आत्ताच स्वर्गस्थ झाले आहेत आणि आपण या शहरातील आणि या मिरा भाईंदर नगरपालिका आणि ग्रामपंचायत ते महापालिका, या प्रवासातील अगदी जवळचे आणि ज्यांना आपण आय विटनेस म्हणतो, असे या शहराचे आय विटनेस आपण आहात की, ज्यांनी गाव ते एक मोठे शहर असा या शहराचा फार मोठा प्रवास आणि विकास पाहिला. मला आठवण आहे, माझा या शहराशी ७८ पासूनचा संबंध आहे. आपण माझ्या फार पूर्वी हे गाव पाहिले. श्री. जयंत पाटील हे या शहराचे जेष्ठ नागरीक आहेत तर खाडीच्या किनारी दलदलीत वसलेली गावे अशी या शहराची ओळख आजूबाजूने मिठागरे. परंतु, मला असे वाटते की, आपण ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच असताना श्री. मोरेश्वर नारायण पाटील, श्री. कृष्णा म्हात्रे यांसारखे जेष्ठ सदस्य कार्यकर्ते या शहराचे जिल्हापरिषदेमध्ये काम करत असताना या शहराच्या विकासासाठी औद्योगिक वसाहती या शहरामध्ये निर्माण केल्या गेल्या की, त्या निमित्ताने या शहरात उद्योगधंदे निर्माण होतील. या शहरातील लोकांना कामधंदा मिळेल आणि इथल्या ग्रामपंचायतीला उत्पन्नाचे साधन मिळेल या हिशोबाने हा उद्देश्य डोळ्यासमोर ठेवून इथे औद्योगिक वसाहती आणल्या गेल्या, आल्या, त्या रुजल्या, त्या जगल्या. आजही मला असे वाटते की, सत्तरच्या दशकात तयार झालेल्या इंडस्ट्रीच्या शेड त्याच आहेत. मधल्या काळामध्ये गावाचे शहर झाले, शहराचे आज महानगर झाले आहे. रस्ते झाले, गटारे झाली आणि हे सगळे करत असताना ज्या औद्योगिक वसाहती आहेत किंवा ज्या औद्योगिक शेड आहेत, त्या खाली गेल्या, रस्ते वर आले. पाणी भरायला लागले. शॉर्ट सर्किट होऊ लागले. माणसे मरायला लागली. उद्योगधंदे डुबायला लागले. मधल्या काळामध्ये शासनाने आपल्याकडे जकात कर लावला. या जकातीच्या भितीने भरपूर जकात भरावी लागते, जकातीचे खाजगीकरण झाले. जोपर्यंत जकात आपल्या महानगरपालिकेच्या ताब्यात होती, तोपर्यंत याच्यावर फारसा परिणाम झालेला आपल्याला दिसला नाही. परंतु, जेव्हा जकातीचे खाजगीकरण झाले, ठेकेदाराच्या हातात जकात गेली, तेव्हा इथल्या उद्योगधंद्यांना किंवा उद्योजकांना ती जकात भरणे दुरापास्त झाले आणि त्याच्या मोबदल्यात आपण काहीच देत नव्हतो. त्यामुळे इथला बराचसा उद्योग हो वापी, गुजरातकडे वळला आणि मधला काळ आपण पाहिला तर मला वाटते की, आपण बरेचसे सदस्य या सदनाचे सभासद आहोत. आपण जकात घालवली आणि उपकर आणला आणि उपकरातून आपल्याला पैसा जमविण्यात किती दमछाक झाली, आपल्या तिजोरीवर त्याचा किती विपरीत परिणाम झाला हे सगळ्यांना माहिती आहे असे असताना मधल्या काळामध्ये आपण स्थानिक संस्था कर चालू केला आणि स्थानिक संस्था करामध्ये मला असे वाटते की, आपण श्री. सुधीर राऊत साहेबांचे कौतुक केले

पाहिजे की, त्यांनी संस्था कर फार चांगल्या प्रकारे चालवला, राबवला त्यांच्या टिमचेसुद्धा आपण धन्यवाद केले पाहिजे की, आज आपल्याकडे संस्था कराचे उद्दीष्ट १४० कोटीचे ठेवलेले आहे आणि मी त्यांच्याशी बोलले तर ते १०० करोडपर्यंत जाऊ शकतात असे त्यांचे म्हणणे आहे. अधिकार सोडला तर आम्ही शंभर कोटीपर्यंत आमचे उत्पन्न नेऊ शकतो, हो त्यांचा आत्मविश्वास फारच वाखाणण्यासारख आहे. साहेब, मला म्हणायचे आहे की, मी यांच्याकडुन काही टक्केवारी मागितली आहे. स्थानिक संस्था कराकडुन ३२.७३ टक्के इतका कर हा आपल्याला औद्योगिक पट्टयातुन मिळतो आणि आपली जी कर आकारणी आहे, या कर आकारणीतून १०० टक्के पैकी २० ते २५ टक्के एवढा कर आपल्याला म्हणजे आपण ज्याला बिगर निवासी कर म्हणतो, ज्याला आपण औद्योगिक कर लावतो, तो कर आपल्याला या उद्योगधंद्यांकडुन मिळतो. त्याचप्रमाणे २० टक्के इतका पाण्याचा अधिभार आपल्याला त्यांच्याकडून मिळतो म्हणजे एकंदर आपण पाहिले तर आपल्या बजेटवर औद्योगिक उद्योगधंद्यांचा फार मोठा असर आहे आणि हे सत्य आपल्याला नाकारून चालणार नाही. असे असताना आपण उद्योगधंद्यांना काय देतो? आपल्याकडे साधी परवानगी कोणी मागायला आले तर आपल्या शंभर अटी असतात. आणि त्या पूर्ण करताना त्याची  दमछाक होते. मध्यंतरी महेश इंडस्ट्रीजचा एक प्रश्न या सभागृहामध्ये असाच गाजला होता. हा फक्त महेश इंडस्ट्रीजचा प्रश्न नाही हा संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये भाईंदर पूर्वेचा भाग, श्री. शशिकांत भोईर, श्री. प्रेमनाथ पाटील, श्री. परशुराम पाटील, श्री. धनेश पाटील, माझा वॉर्ड  श्री. नरेंद्र मेहता यांचा वॉर्ड, पूर्वीचा आपला वॉर्ड मा. महापौरांचा वॉर्ड असे अनेक वॉर्ड उद्योगधंद्यांनी खचाखच भरलेले आहेत. एक ट्रक आतमध्ये शिरला तर सगळी ट्राफिक जाम होऊन जाते. त्यांना बाहेर पडायला मार्ग नसतात त्यांच्या एवढ्या अडचणी आहेत. पण आपण त्यांच्या अडचणी कधी बघत नाही. ज्यांचा इफेक्ट डायरेक्ट आपल्या प्रशासनावर होतो आपल्या विकासावर होणार आहे, त्यांना आपण काय देतो? मला एवढेच म्हणायचे आहे की, भुगोलाच्या पुस्तकामध्ये तुम्ही महाराष्ट्राचा भुगोल उघडून पाहा. महाराष्ट्राचा भुगोलामध्ये मिरा भाईंदर शहराचे नाव मिठागर म्हणून आहे, कारण तो इथला पारंपारिक उद्योग आहे. परंतु, रंग, रसायन, स्टील उद्योगामध्ये शासनाने ह्या शहराची दखल घेतली. ही शासनाने घेतलेली दखल किंवा भुगोलाच्या पुस्तकामध्ये रंगलेले शहर, जर इथले उद्योग सोयी सुविधांच्या अभावे इकडुन निघून गेले, तर आपल्या शहराची ओळखही पुसणार आहे आणि आपल्या तिजोरीवरचा भार खुप हलका होणार आहे आणि पर्यायाने तो आपल्या मानगुटीवर येऊन बसणार आहे. तेव्हा या उद्योगधंद्यांना वाचवायचे असेल तर आपल्याला काहीतरी ठोस उपाय योजना करावी लागेल. यासाठी माझी आपल्याला विनंती आहे, मी थोडेसे बजेटमध्ये बघते तर इंडस्ट्रीमध्ये रस्ते आणि गटार दुरुस्तीच्या लेखाशिर्षाखाली आपण पन्नास लाखाची तरतुद केली आहे. मला विचारायचे आहे की, हे पैसे खर्च झाले आहेत का? म्हणजे आत्ता बजेट संपायला आले आहे.

**दिपक खांबित :-**

इंडस्ट्रीमध्ये सगळी कामे प्रस्तावित आहेत.

**प्रभात पाटील :-**

मला आपल्याला पून्हा एकदा सांगावेसे वाटते की, शहराची ही ओळख आणि शहरातील सर्वात मोठा करदाता म्हणून हे उद्योगधंदे पून्हा एकदा गुजरातसारख्या शहरांकडे किंवा इतर कोणत्याही शहरांकडे वळणार नाहीत. त्यांना आपणच सोयी सुविधा द्याव्या. त्यांनी आपल्याच शहरात रहावे की, जेणेकरुन त्याचा आपल्यालाच फायदा आहे. अशा या उद्योगांसाठी स्मॉल स्केल इंडस्ट्रीसाठी काहीतरी धोरणात्मक निर्णय घेणे हे अतिशय गरजेचे आहे म्हणून मी आपणांस विनंती करते की, प्रशासन आणि पदाधिकारी हे दोन घटक घेऊन, औद्योगिक क्षेत्रातील काही व्यक्ती घेऊन त्यांचे एक शिष्टमंडळ घेऊन चर्चा घडवून आणावी. त्यांना आपल्याकडुन काय अपेक्षित आहे आपण त्यांना काय देऊ शकतो, अशी चर्चा घडवून हा छोटा उद्योजक या शहरातून जाणार नाही, याची आपण पूरेपूर काळजी घ्याल, याच्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते आणि आपण ते कराल अशी मला आशा आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मा. सभागृह नेता यांनी खरोखरच एक चांगली लक्षवेधी आज इथे मांडलेली आहे. हा विषय बोलण्याकरीता मी याकरीता तुमच्याकडुन आज परवानगी मागितली की हा विषय मलाही निगडीत आहे. माझा भाईंदर ईस्टमध्ये इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये छोटासा व्यवसाय आहे. मला काही अडचणी येतात, त्या आज मा. सभागृह नेत्यांच्या तोंडून लक्षवेधीच्या माध्यमातून आपल्याला ऐकायला मिळाल्या. या शहरामध्ये उद्योगधंदे किंवा इंडस्ट्रीज आज आपल्या अर्थव्यवस्थेचा मोठा वाटा त्यांनी उचललेला आहे. एल.बी.टी च्या माध्यमातून मिळालेल्या माहितीप्रमाणे कमीत कमी पाच हजार असे व्यवसाय छोटे मोठे इंडस्ट्रीयल इस्टेट, इंडस्ट्रीअल गाळे आपल्या शहरामध्ये चालतात. ते फक्त एल.बी.टी.चं नाही तर करही भरतात. परवाना शुल्कही आम्हाला देत आहेत. म्हणजे आपल्या अर्थव्यवस्थेचा सगळ्यात मोठा वाटा ते उचलत आहेत म्हणून त्यांना आपल्याला जास्तीत जास्त सोयी सुविधा दिल्या पाहिजेत. मिरा भाईंदर मध्ये रिलायन्स पावर असल्यामुळे लोक वसई विरारकडे वळले, कारण तिथे एम.एस.ई.बी. चे पावर सप्लाय आहेत. त्यांचे दर कमी असल्यामुळे इंडस्ट्रीज वसई-विरारकडे गेल्या आणि या शहरामधून इंडस्ट्रीज कमी झाल्या. इंडस्ट्रीज कमी होणे याचा अर्थ उद्योगधंदा कमी होणे. उद्योगधंदा कमी होणे याचा अर्थ आपल्या अर्थव्यवस्थेला हानी पोहोचणारच त्याचबरोबर या शहरामधील लोकांना जो व्यवसाय मिळतो, नोकऱ्या मिळतात, तेही कमी होतात. साहेब, ती

पन्नास लाखाची जी तरतुद केलेली आहे, ती आम्हाला कधीच पुरणार नाही. कदाचित आमची अर्थव्यवस्था किंवा आमचे बजेट त्या दृष्टीकोनातून त्यांनी त्यावेळी बघितले नाही. इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये आपण जास्तीत जास्त सुविधा दिल्या तर इथले उद्योगधंदे वाढतील. लोकांना इथे जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध होईल. या शहराचा विकास होईल. या पालिकेला एल.बी.टी., टॅक्स आणि परवाना शुल्काच्या माध्यमातून त्याचा आर्थिक फायदा होईल म्हणून साहेब या विषयावर बारकाईने नजर ठेवून एक चांगली भुमिका जेवढे असे उद्योगधंदे आहेत त्यांना लागणाऱ्या सोयी सुविधा आम्ही पूरवू शकू. चांगले रस्ते, पावसाचे पाणी, निचरा होण्याकरीता चांगले गटार, दिवाबत्ती आणि मा. सभागृह नेत्यांनी जसे आपल्या लक्षवेधीमध्ये मांडलेले आहे. गाळे उंच करण्याकरीता ज्या दुरुस्ती परवानग्या लागतात, साहेब त्यांची एक-एक फाईल दोन दोन वर्षे आपल्याकडे प्रलंबित राहते. कारण, ग्रामपंचायत काळी बांधलेले ते गाळे आहेत. त्यांच्याकडे लागणारी कागदपत्रे ते कधी पुरवू शकणार नाहीत. लागणाऱ्या अटीशर्ती पूर्ण करु शकणार नाहीत. आत्ता कमीत कमी या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून त्या विषयावर आपण जातीने लक्ष घालून याला कसे सोयीस्कर करता येईल, जेणेकरुन इथले उद्योगधंदे चांगल्या प्रमाणात चालतील यावर काम केले पाहिजे. मला बोलायची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, मै स्टील बफींग असोसिएशन की अध्यक्षा हूँ। इसके लिए मुझे हर जगह गली-गली जाना पडता है। मैने उनकी स्थिती देखी है। इस तरह की उनकी स्थिती है। अब मा. सभागृह नेता मॅडमने जिस तरह का लक्षवेधी दिया है। उसके उपर मै भी थोडीसी विनंती करना चाहती हूँ की, उनके यहा अच्छे रस्ते छोडीए, वो रस्ते पर चल नही सकते। इस तरह के उनके रस्ते है। और गटर इतने छोटे है की, उसमेंसे पाणी भी पास नही हो सकता है। अभी थोडे दिन पहलेही बफींग युनियन के लोगोने कमिशनर साहबसे मुलाखत कियी है। मोर्चा लेकर आये थे। बफींग के सुखे मटेरिअल है, वो उठानेके लिए अपने पास ना गाडी की व्यवस्था, नाही किसी जगह की व्यवस्था है। तीन-तीन, चार-चार महीने उनका कचरा ऐसे ही उनके फॅक्टरी और इन्डस्ट्री के सामने पडा रहता है। एशिया में सबसे बडी स्टी ल के लिए इंडस्ट्री, यह मिरा भाईंदर क्षेत्र माना जाता है। यहॉ से सबसे बडा स्टील का उत्पादन होता है। ऐसी स्थिती मे अगर अपने पास उनका कचरा उठाने के लिए जगह नही है। उनको कोई सुख सुविधा नही दे पा रहे है। ना ही दवा का छिडकाव होता है। ना रोड है, ना रस्ते है, ना गटर है। तो ऐसी स्थितीमें यह इंडस्ट्रीयल क्षेत्र, यह औद्योगिक क्षेत्र मिरा भाईंदर के बाहर शिफ्ट हो रहे है। इसका परिणाम मिरा भाईंदर शहरके इन्कम पर पडेगा, जो हमारे बजेट को प्रभावित करेगा। इसलिए आप लोग नगरपालिका के तरफ से, इसपर ध्यान दिया जाए। यह मेरी विनंती है।

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, आत्ता आपल्या मा. सभागृह नेता श्रीम. प्रभातताई पाटील यांनी लक्षवेधीच्या माध्यामातून चांगली सुचना आणलेली आहे. आम्ही या शहराचे जुने नागरिक आहेत श्री. मोरूभाऊ श्री. किसनभाऊ यांच्या सारख्यांनी या इंडस्ट्रीज जगविण्यासाठी जिल्हा परिषदेकडून लोन आणून किंवा जिल्हापरिषदेच्या माध्यमातून रोड, रस्ते पूर्ण केले होते आणि त्यावेळेपासून आपल्या भाईंदरमध्ये इंडस्ट्री आहेत. आज या इंडस्ट्रीमध्ये बफींग आणि स्टीलचे मोठे मोठे कारखाने आहेत. आपल्याकरिता आज आपण त्यांना ऑक्ट्रॉय काढून उपकर लावला आहे. ते लोक आपल्याला चांगल्या पध्दतीने साथ देतात. ते न चुकता आपला उपकर भरतात. आपल्या उघाडीवरून आपल्याला माहीती पडत असेल की, चांगल्या प्रकारे येते आणि हे असताना सुध्दा मला हे आश्चर्य वाटते की, आपल्या सार्वजनिक बांधकामाला हे का दिसत नाही? नको त्या ठिकाणचे रोड हे लोक करतात आणि याचा सुझाव ते का करत नाहीत? पन्नास, हजारांची तरतुद करतात आणि आज एवढ्या मोठ्या इंडस्ट्री आहेत. आपण त्यांचे रस्ते घ्या आणि त्यांना वर बांधण्याकरिता परमिशन द्या. जर रस्त्यामध्ये अबाधित होत असेल तर त्यांना वर बांधण्याकरिता परवानगी द्या. आपण जर त्यांना या सुविधा दिल्या नाहीत, तर इथली अर्धी इंडस्ट्री गेलेली आहे, ही अर्धीसुध्दा जाण्याचा मार्गावर आहे. ती थोपवणे आपल्या हातामध्ये आहे. साहेब, तुमच्या वॉर्डमध्येपण इंडस्ट्रीयल आहे. आज बफींगचे कारखाने आहेत. त्या इंडस्ट्रीमध्ये स्त्रिया, मुली किंवा जे लोक जातात त्यांना मुतारी नाही. आणि आपले वॉर्ड ऑफीसर इतके बेवरलेले आहेत की, ते लोक कधी त्या ठिकाणी फिरत नाहीत. त्यांच्या अडीअडचणी काय आहेत हे कधी जाणून घेत नाहीत. त्यांनी याच्याकरिता तरतुद करायला पाहिजे. बजेटमध्ये जास्तीत जास्त तरतुद मागणी करायला पाहिजे की, या इंडस्ट्रीकरिता द्या. ते आपल्याला टॅक्स तर देतातच, वर आपल्या शहरामध्ये जे प्रोग्राम होतात त्याच्याकरिता सुध्दा ते सढळ हाताने मदत करतात. नवरात्री असू द्या, गणपती असू द्या, प्रत्येक वेळेला ते फुल ना फुलाची पाकळी देऊन त्याच्याकरिता ते आपल्याला सहकार्य करत असतात. अशा लोकांना जर आपण इथे ठेवले आणि जर हाकलायच्या मार्गावर आपण असणार तर आपल्या सारखे कोणी वाईट नाही. त्याच्याकरिता साहेब, याच्यामध्ये तुम्ही पुढाकार घ्यायला पाहिजे. आणि तुम्ही पुढाकार घेऊन त्या इंडस्ट्रीच्या लोकांना तुम्ही बोलवा. त्यांच्या काय मागण्या आहेत त्या मान्य करा. त्यांना जेवढ्या सुख सुविधा पुरवता येतील त्या पुरवा अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मा. सभागृह नेत्यांनी आत्ता जी लक्षवेधी मांडली आहे, त्या लक्षवेधीमध्ये त्यांनी दोन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. एक त्या इंडस्ट्रीच्या ज्या सुखसुविधा आहेत, त्या दिल्या पाहिजे. आणि रस्ता रूंदीकरणासाठी वाढीव क्षेत्र देऊन इंडस्ट्रीना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्या इंडस्ट्री ऑक्ट्रायमुळे किंवा इकडे सुख सुविधा होत नाहीत म्हणून या शहरामधून चाललेल्या आहेत. पण एक गोष्ट जसे श्री. मोरेश्वर पाटील साहेबांचे नाव घेतले, श्री. कृष्णकांत म्हात्रे साहेबांचे नाव घेतले, एक नाव अजून राहीलेले आहे. या शहराची इंडस्ट्री गेली असती जर श्री. रोहिदास पाटील आणि श्री. राम नाईक यांनी दहा एच.पी.च्या इंडस्ट्रीचे पास करून घेतले नसते तर भाईंदरचे उद्योग इकडे टिकले नसते मला माहीती आहे. ही कडू घटना आहे. पण ही सत्य गोष्ट आहे. श्री. रोहिदास पाटील आणि श्री. राम नाईक यांनी या इंडस्ट्रीला वाचविण्याकरिता. दहा टक्के इलेक्ट्रीक पावर त्यावेळी मिळवून दिली. आज त्या इंडस्ट्री या भाईंदरमध्ये आहेत. माझी आपल्याला विनंती आहे. लक्षवेधी चांगली आहे. आणि आपण या बजेटमध्ये जास्तीत जास्त तरतुद या इंडस्ट्रीसाठी करावी अशी आमची सुचना आहे.

**मिलन पाटीलः-**

श्री. रोहिदास पाटील यांनी जे काम केलेले आहे. त्यांनी त्यांच्या स्वार्थाकरिता पण केले आहे. त्यांचीसुध्दा इंडस्ट्री आहे. स्वतः गावाकरिता केलेले नाही. गावाकरिता त्याग करायला पाहिजे.

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

शक्य तेवढ्या लवकरता लवकर हा इंडस्ट्रीचा प्रश्न चांगल्या तऱ्हेने सोडवता येईल असा आपण प्रयत्न करू.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, एक सुचना आहे.

**मा. महापौर :-**

आत्ता विषय झाला.

**प्रविण पाटील :-**

त्याच्या अनुषंगाने सुचना आहे की, आज इंडस्ट्रीमध्ये सुख सुविधा पुरवताना महापालिकेचे कर्तव्य आहे की, ज्या-ज्या इंडस्ट्री आहेत, त्याच्या एका मालकाच्या चार-चार, पाच-पाच फॅक्टरी आहेत. या सगळ्या फॅक्टरीच्या नोंदी महापालिकेकडे आहेत का? आपण त्यांच्या सुख-सुविधांचा विचार करतो. पण आज महापालिकेकडे त्यांच्या सगळ्या नोंदी नाहीत. नसतील तर त्या लवकरात लवकर करण्यांत याव्या ही सुचना संबंधीत अधिकाऱ्यांना कळवा.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने श्री. हंसुकुमार पांडे यांना सभागृहात बोलावून सन्मा. सदस्यांकडून त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत आहे. नवनिर्वाचित स्विकृत सदस्य श्री. हंसकुमार पांडे यांना पुष्पगुच्छ देऊन मा. महापौर साहेब, त्यांचा सत्कार करत आहेत. कृपया त्यांनी डायसवर यायचे आहे. (श्री. हंसकुमार पांडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यांत आला.)

**आसिफ शेख :-**

सत्ताधारी पक्षाचे नवनिर्वाचित सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांना विरोधी पक्षाच्यापण मनःपुर्वक हार्दिक शुभेच्छा.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहब के परवानगी से दो शब्द बोल रहा हूँ। सबसे पहले मै कॉग्रेस पक्ष के नेता मा. श्री. मुझफ्फर हुसैन साहब को धन्यवाद देता हूँ। जिन्होने मुझपर विश्वास रखकर यह पद मुझे सौंपा। मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा साहब का भी धन्यवाद करता हूँ। मा. महापौर श्री. तुळशीदास म्हात्रे साहब, मा. उपमहापौर श्री. जयंतदादा पाटील, मा. सभागृह नेता श्रीम. प्रभातताई पाटील, गटनेता श्री. एस.ए.खान साहब, मा. विरोधी पक्षनेता श्री. आसिफ शेख, हमारे कमिशनर श्री. सुधीर राऊत और सभागृहके सभी नगरसेवकोंका का धन्यवाद करता हूँ। और कोशिश करूंगा की, श्री. मुझफ्फर हुसैन साहब ने जो काम मुझे सौंपा है, उसमे मे खरा उतरू। और आप लोगों के साथ मिल जुलकर काम करू। धन्यवाद, जय हिंद जय महाराष्ट्र।

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. नवनिर्वाचित नामनिर्देशित सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांचे या सभागृहातर्फे हार्दिक स्वागत करतो.

**आसिफ शेख :-**

आजचा कोकण चौफेर, गुरूवार दि. २९ सप्टेंबर २०११ कोकण चौफेर या दैनिक वृत्तपत्रामध्ये पान क्रमांक पहिल्यावरच एक बातमी आहे. अन गोरी गाडी कोणाची? पान क्र. २ वर संपूर्ण मजकूर लिहिला आहे. मी दोन मिनिटात, जास्त वेळ घेणार नाही. अत्यंत महत्वाचा विषय आहे. चौफेर वॉच या छायावृत्तामध्ये मागील काही अंकात आम्ही वाहतुक पोलिसांच्या पिवळ्या दिव्याच्या गाडीची तुटलेली नंबरप्लेट हे छायावृत्त पहिल्या

पानावर प्रसिध्द केले होते. शासन आणि प्रशासनातील अशा तऱ्हेच्या बेजबाबदारपणाचा आणखी एक नमुना...........

**मिलन म्हात्रे :-**

मागे श्री. जयंत पाटील यांनी नियम सांगितला आहे की, वर्तमानपत्रातील बातम्यांची दखल घ्यायची नाही.

**आसिफ शेख :-**

वरील क्रमांकाची गाडी ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाची असल्याचे समजले. कारण त्या गाडीवर काहीही लिहिलेले नाही. अगदी एमबीएमसी अर्थात मिरा भाईंदर महानगरपालिका असेही लिहिलेले नाही. अग्निशमन विभागाची गाडी लाल रंगाची असावी असा प्रघात आहे. या गाडीवर मराठीत अग्नीशमन किंवा इंग्रजीत फायर ब्रिगेड यापैकी काही लिहिलेले नाही. गाडीवरच्या पिवळ्या दिव्यामुळे मात्र रस्त्यावरील ट्राफीकवाल्यांना पदोपदी आपली टोपी स्वच्छ करावी लागते. तर डान्स बारवाल्यांचीही पळापळ होते. हे एवढ्या वरच थांबत नाही. गाडीत बसणारा सिव्हील ड्रेसमध्ये असेल तर तो भलताच इंम्प्रेशन मारतो. आपण फायर ब्रिगेडवाले नाही तर पोलिस अधिकारी किंवा प्रांत अधिकारी असल्याचे तो भासवू शकतो. तसेही शहरात पोलीस, बोगस सरकारी अधिकारी अशी तोतयेगिरीची कमी नाही. त्यामुळे संबंधितांनी लवकरात लवकर ही गाडी कोणाची याचा खुलासा करावा अशी मागणी पुढे येत आहे. कोकण चौफेर मधील ही बातमी आहे. आणि अत्यंत महत्वाची आहे. या शहराचे प्रथम नागरिक मा. महापौर आहेत. मा. महापौरांच्या गाडीवर लाल दिवा आहे. पण तिथे लिहीलेले पण आहे. मा. महापौर मिरा भाईंदर महानगरपालिका मा. सभागृह नेत्यांची गाडी आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांची गाडी आहे, मा. स्थायी समिती सभापतींची गाडी आहे. ज्या पदाधिकाऱ्यांच्या गाड्या आहेत किंवा अधिकाऱ्यांच्या गाड्या आहेत, त्यावर मिरा भाईंदर महानगरपालिका आणि संबंधीत पदाधिकाऱ्याचे पदनाम लिहिले आहे. पण ही गाडी कोणाची हे अद्याप कळायला मार्ग नाही. तर मला वाटते की, हे डिपार्टमेंट ज्यांच्याकडे आहे, त्याचे प्रमुख श्री. पानपट्टे साहेब आहेत. तर श्री. पानपट्टे साहेबांना माझी विनंती आहे की, आपण दुसऱ्या कोणाची ओझी आपल्या खांद्यावर घेत जाऊ नका, मी मागे पण आपल्याला कळवलेले आहे की, हे लोक लफडी करतात, नाव तुमचे येते. करून गेले गाव आणि पानपट्टेंचे नाव अशी परिस्थिती पुढे निर्माण व्हायला नको. म्हणून आपण याची तातडीने दखल घ्यावी. त्या गाडीवर जो फायब्रिगेडचा लाल कलर आहे तो द्या. त्यावर मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभाग असे लिहा. आणि असे हे सहा-सहा महीन्यापांसून चाललेले आहे. हे योग्य नाही. संपूर्ण शहरात हा वेगळा मॅसेज जातो की, नक्की त्या गाडीत कोण मा. आयुक्त बसले आहेत की, दुसरे कोण बसले आहेत कलेक्टर बसले आहेत. एस.पी. बसले आहेत की, डी.वाय.एस.पी. बसले आहेत? नक्की कोण बसले आहेत? त्याचे संपूर्ण व्यवस्थित गाडीला जो आवश्यक कलर आपल्या रूल्स प्रमाणे आहे. त्याची आपण तंतोतंत आजच्या या आमच्या सुचनेची दखल घ्यावी आणि त्वरीत आजच्या आजच कलर करायची आणि नाव टाकायची कार्यवाही करण्यात यावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो, एक अभिनंदनाचा ठराव आहे. अग्निशमन दलातील.................

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, याच्यावर खुलासा करावा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, संबंधित अधिकाऱ्यांकडून याचा खुलासा घ्या की, नक्की काय कार्यवाही करता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझी एक अशी सुचना आहे की, श्री. आसिफ शेख साहेब जसे बोलले, त्याप्रमाणे आपला एक अधिकारी दुसऱ्या गाडीमध्ये चार-चार पिवळ्या बत्त्या घेऊन फिरतो. त्यांच्या खाजगी गाडीमध्ये त्यांना अंबर दिवा लावण्याची परवानगी नसतानासुध्दा त्या गाडीत चार-चार दिवे लावलेले असतात. गाड्या बदलतात, बत्त्या बदलतात. तपास करा, नाही तर आम्ही गाडीचा नंबर देतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदर गाडी नव्याने घेतलेली आहे. त्याचा कलर तत्काळ बदलून घेऊ. गाडीला तीन-चार महिने झाले आहेत. ती गाडी अग्निशमन अधिकाऱ्यांची आहे.

**भगवती शर्मा :-**

श्री. पानपट्टे साहब, इस न्युज के अंदर बताया गया है की, यह गाडी बिअर बार के पास खडी थी।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, चौकशी करतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. एक अभिनंदनाचा ठराव आहे. अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महापालिकेतर्फे सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व

रोख रक्कम देऊन गौरविणेबाबत. ही घटना माझ्या वॉर्डामधील आहे. लता अपार्टमेंट बिल्डींग, याचे दोन स्लॅब पडले, त्याच्यात सहाजण मृत्यु झाले आणि चारजण जखमी झाले. यावेळेस अग्निशमन दलाच्या जवानांनी चांगली कामगिरी केली, त्याबद्दलचा ठराव आहे. दि. २३/०९/२०११ रोजी भाईंदर(पूर्व) विभागातील खारीगांव येथे लता बिल्डींग या इमारतीचे दोन स्लॅब कोसळून झालेल्या अपघात स्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून घडलेल्या दुर्घटने प्रसंगी अत्यंत गंभीर व तणावग्रस्त परिस्थीतीत आपल्या प्राणाची पर्वा न करता अत्यंत निष्ठेने कर्तव्य बजावून चार व्यक्तींचे प्राण वाचविण्यास मदत केली आहे. तसेच मिरा भाईंदर अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या तत्परतेमुळे जखमींवर वेळीच उपचार करणे शक्य झाले. मिरा भाईंदर अग्निशमन दलाची सदरची कार्यवाही गौरवास्पद असून त्यांना प्रोत्साहन म्हणून त्यांची कर्तव्ये निष्ठेने पार पडलेल्या त्याच्या कर्तबगारी करिता मिरा भाईंदर महापालिकेतर्फे अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे. तसेच मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील लता अपार्टमेंट इमारतीमधील स्लॅब कोसळून जी दुर्घटना घडली. त्या दुर्घटनेत सहा व्यक्ती मृत झाल्या व चार व्यक्ती जखमी झाल्या. मृत व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत. १) कुमारी शिल्पा डे, वय ५ वर्षे, २) कु. रंजना यादव, वय ६ वर्षे ३) कु. सोनाली चंद्रपाल, वय २० वर्षे ४) कु. नेत्रा रेडेकर, वय २५ वर्षे ५) सौ. गायत्री यादव, वय २८ वर्षे ६) श्री. राजेंद्र कुमार यादव, वय ३५ वर्षे यांच्या आत्म्यास चिःरशांती मिळावी. मा. महापौरांना माझी विनंती आहे की, आपल्या महापौर सहाय्यता निधीतून मृत व जखमी यांच्या नातेवाईकांना काही मदत म्हणून आपण सहाय्यता द्यावी अशी मी सुचना करत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मदत निधीचा प्रश्न निघाला म्हणून मी परत विचारतो. गेल्या मिटींगल्‍ा मी विचारले होते. बॉम्बस्फोटामध्ये जे जखमी झाले आणि मृत पावले त्यांना जी मदत आपण देणार होतो, त्याच्यावर काय निर्णय झाला त्याचा जरा खुलासा करा.

**मा. महापौर :-**

या ठिकाणी जे बॉम्बस्फोटामध्ये मृत व जखमी झाले, त्यांना सर्वांना आपण उद्या किंवा परवा पैसे देणार आहोत. या ठिकाणी श्री. शशिकांत भोईर यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही जो निश्चय केला होता की, जेणेकरून आत्ता जे मृत पावले त्यांना ५०,००० रूपये आणि जखमींना पंचवीस हजार रूपये डिक्लेअर करतो. आणि दोन तीन दिवसामध्ये या चेक बरोबर यांचाही चेक देण्यात येईल.

**अभिनंदन ठराव क्र. ५७ :-**

भाईंदर (पूर्व) येथील लता अपार्टमेंटमध्ये झालेल्या अपघातात, अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महापालिकेतर्फे सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देऊन गौरविणेबाबत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. आपल्या प्रभाग समितीतील कामे बऱ्याच दिवसापासून पेन्डींग आहेत. ते एस्टीमेटपण बनवत नाहीत. मा. आयुक्त सांगतात की, मी बधितल्याशिवाय काम करणार नाही. आम्हाला इंजिनियरनी असे सांगितले की, मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, ही कामे चालणार नाहीत. दुसरी कामे सुचवून द्या. नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये कामच नसेल, तर आम्ही कोणती कामे सुचवायची? याचापण खुलासा व्हावा. मागील तीन महिन्यांपासून प्रभाग समितींची कामे दिलेली आहेत. त्याचे एकही एस्टीमेन्ट तयार होत नाही.

**आसिफ शेख :-**

मा . महापौर साहेब, या संदर्भात आपले स्थानिक मा. आमदार श्री. गिल्बर्ट जॉन मेंन्डोसा साहेब.......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. आसिफ शेख तुम्ही जरा थांबा. आम्हाला बोलू दया. प्रभाग समितीची कामे का घेत नाहीत आणि एस्टीमेंट का बनवत नाहीत. याचा मा. आयुक्तांनी, श्री राऊत साहेबांनी उभे रहावे आणि खुलासा करावा.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

बांधकाम विभागाच्या आधिका-यांनी याचा ताबडतोब खुलासा करावा.

**एस.ए. खान :-**

श्री. खांबित साहेब, जरा खुलासा करा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सर्व नागरिकांचे एकच म्हणणे आहे. श्री. प्रेमनाथ पाटील साहेंबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्या मताशी आम्ही सहमत आहोत. कुठल्याही प्रभागात कामे होत नाहीत. आम्ही ज्यावेळेला निवडणूकीला उभे राहिलो, त्यावेळेला लोकांना प्रॉमीस केले होते की, आम्ही कामे करून देऊ. पण कोणत्याही प्रकारचे काम या ठिकाणी आत्ता होत नाही. लोकांना आम्ही काय उत्तर दयायचे ? आज २०१२ च्या निवडणूका तोंडावर आलेल्या आहेत आणि वॉर्डमध्ये कामे झालेली नाहीत. आपल्याला सांगायचे म्हणजे, गणपतीच्या पूर्वी रस्त्याचे डांबरीकरण होणार होते, तेही झालेले नाही. आणि प्रभाग समिती, नगरसेवक निधी यामधून कोणतीही कामे झालेली नाहीत. याचा पहिल्यांदा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

मी सभागृहाच्या मताशी सहमत आहे. प्रशासनाला खुलासा करू दया.

**मधुसूदन पूरोहित :-**

यांचे प्रश्न असे आहेत की, कामे होत नाहीत. मला तर लोकांनी असे सांगितले आहे की, प्रभाग निधी रद्द केलेले आहे नगरसेवक निधी रद्द केलेले आहे. पहिला तो खुलासा करा की नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी अस्तित्वात आहे की रद्द केलेला आहे? पहिले तिथून चालू करा. कामे तर नंतर होतील.

**मा. महापौर :-**

रद्द करायचा इकडे कोणाचा अधिकार आहे का?

**मधुसूदन पूरोहित :-**

हे प्रभाग अधिकारी नाही. म्हणजे आम्ही सुचना दयायची. मा. महापौर साहेब, तुमचा विरोध आहे का? मी एखादी सुचना दिल्यानंतर तुमचा विरोध आहे का? त्यांची बाजू घेण्याची काही गरज नाही. जी निष्क्रीयता आहे, ती दाखवणे गरजेचे आहे. तुम्ही त्याची बाजू कशाला घेता?

**मा. महापौर :-**

कॅन्सल करण्याचा अधिकार त्यांना आहे का? सभागृहामध्ये ठराव झालेला असतो. तो कॅन्सल करायचा प्रशासनाला अधिकार आहे का?

**मधुसूदन पूरोहित :-**

आम्ही सुचना मांडू शकतो की, नाही?

**(सभागृहात गोंधळ)**

**दिपक खांबीत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. ज्या-ज्या नगरसेवकांनी प्रभाग समितीची पत्र दिली होती. त्या सगळया कामाची काल मा. आयुक्तांनी स्वतः पाहणी केली आणि पाहणीमध्ये त्यांनी जी जी कामे सांगितलेली आहेत, जी अत्यावश्यक कामे आहेत, गटाराचे रूदीकरण करणे, गटारावर स्लॅब टाकणे, अशी जी काही अत्यावश्यक कामे आहेत, ती त्यांनी उदयाच त्यांच्याकडे पुटअप करून मंजुरी घ्यायला सांगितलेली आहेत. त्यांनी टिपणी मंजुर केली की, आम्ही शनिवारपर्यंत सगळया प्रभाग समीतींना त्या-त्या कामाचे एस्टीमेट मंजुरीकरीता सादर करू.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्या प्रभागामध्ये उद्या मिटींग आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

श्री. खांबित साहेब, अत्यावश्यक म्हणजे काय? आमच्या नगरसेवक निधीमध्ये काम असेल, तेच आम्हाला अत्यावश्यक वाटते.

**दिपक खांबित :-**

ज्या-ज्या नगरसेवकांनी, गटारावर अस्तित्वामध्ये स्लॅब आहेत. त्याच्यावर पेव्हर ब्लॉक लावायला सांगितले आहेत, अशा कामामध्ये साहेबांनी निर्णय घेतलेला नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आमच्या प्रभागात तेच काम आहे.

**( सभागृहात गोंधळ )**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आमच्या प्रभागातील निधी वापरण्याचा अधिकार नगरसेवकांना आहे. नगरसेवकांनी सुचवलेली कामे केलीच पाहिजे. तुम्ही कॅन्सल का करता? कमिशनर का कॅन्सल करतात?

**दिपक खांबित :-**

जी अत्यावश्यक कामे आहेत ती करणारच.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

किती नगरसेवकांची कामे कॅन्सल केली.

**(सभागृहात गोंधळ )**

**दिपक खांबित :-**

साहेब, तुमच्या प्रभागात काल गेले होते. माशाचा पाड्याचा जो रस्ता आहे, पंधरा लाखाचे काम साहेबांनी स्वतः कालच्या काल मंजुर केले.

**(सभागृहात गोंधळ )**

**जयंत पाटील ( मा. उपमहापौर ):-**

मा. आयुक्त साहेब, मला एका गोष्टीची माहीती द्या की, प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी हा नगरसेवकांच्या हक्काचा निधी आहे. याची प्रायोरिटी कोणती घ्यायची, कोणते काम घ्यायचे हा नगरसेवकांचा हक्क आहे. तुम्ही फक्त एवढेच बघायचे की, ते काम नियमामध्ये आहे की नाही. मा. आयुक्तांनी हे ठरवू नये की, इकडे खड्डा नाही हे काम करणार नाही. मग त्या नगरसेवक निधीला अर्थच काय? नगरसेवक निधी नगरसेवकांचा आहे.

**मधुसूदन पूरोहित :-**

मा. उपमहापौर, मा. आयुक्तांनी आज इथे उपस्थित राहाणे गरजेच होते.

**जयंत पाटील ( मा. उपमहापौर ):-**

जनरल निधी कोणता पुढे वापरायचा हे ठिक आहे, ते तुम्ही ठरवा. परंतु प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी याचे अधिकार नगरसेवकांना द्या. त्यांचे काम योग्य आहे की, नाही ते बघा. ते जी कामे करतात ती जनतेसाठी करतात.

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्तने इस मिटींग मे आना चाहिए। उनको मालुम होना चाहिए की, नगरसेवकों की क्या समस्या है।

**मधुसूदन पुरोहीत :-**

ते आठवड्यात दोन दिवस दोन तास आम्हाला भेटतात.

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहेबांना मिटींगला बोलवा. का बोलवत नाही? गेल्या मिटींगला नव्हते. आजपण उपस्थित नाहीत. का उपस्थित नाहीत?

**मधुसूदन पुरोहित :-**

त्यांना मा. महासभा ही विशेष वाटत नाही. म्हणून ते इथे येत नाहीत. म्हणजे त्यांनी फक्त पाहणी करावी. त्यांनी निष्कर्ष द्यावा. त्यांनी जो लॉ लागू केला ते आम्ही सर्वांनी स्विकार करावा असे आहे काय? आत्ता इथे बसलेले संबंधित अधिकारी आहेत ते फक्त त्यांच्याकडे जातात, विचारपूस करतात अणि परत येतात. आणि याच्या नंतरचा काही निष्कर्ष निघणार नाही. एखादा व्यक्ती विशेष जाऊन सांगणार की, ही कामे करायची नाही. याचा अर्थ आम्ही जनतेला जाऊन काय उत्तर देणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण याच्यावर रूलिंग द्यावे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आपल्या महानगरपालिकेमध्ये चार प्रभाग समित्या आहेत. कोणत्या प्रभागामध्ये कोणते काम करायला पाहिजे, ते काम किती अत्यावश्यक आहे, त्याच्यासाठी प्रभाग समित्यांच्या बैठका लागतात. अणि त्या-त्या बैठकीमध्ये कोणत्या नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये काय कामे अशी रिक्वायरमेंट आहे, ते काम करणे किती आवश्यक आहे, त्या संदर्भात आपण चर्चा करतो. मत तिकडे कुठल्याही पध्दतीचे काही विचारले जात नाही. कुठली माहीतीच दिली जात नाही. प्रभाग समितीच्या माध्यमातून कुठलेही काम तिथे जागेवर पूर्ण होत नाही. मग कशासाठी प्रभाग समित्या? कशासाठी प्रभाग समित्यांचे सभापती?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कशासाठी प्रभाग समिती? त्या प्रभाग समितीचे अधिकारी काय काम करतात? लोकांची कामे बरोबर करतात.

**लक्ष्मण जंगम :-**

जे प्रभागाचे अध्यक्ष आहेत, कुठल्या प्रभागाच्या अध्यक्षाला तिकडे निर्णय घेण्याएवढी, कुठलीही त्यांच्या क्षमतेची तेवढी परवानगी त्यांच्याकडे नाही. किंवा त्यांना तेवढे तसे आदेश नाहीत. तेवढे अधिकारच त्यांना नाहीत. मग कशाला ही सगळी प्रभाग कार्यालये? तिथे ना टॅक्सचा विषय पूर्ण होत, ना पाण्याचा पूर्ण होत, ना बांधकाम पूर्ण होत, ना अतिक्रमणाचा पूर्ण होत. सगळे हेड ऑफीसवरूनच होणार. सगळे कमिशनरच फायनल करणार आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

रस्त्यावरचे फेरिवालेसुध्दा यांना उचलता येत नाहीत.

**लक्ष्मण जंगम :-**

सगळे अधिकार जर मा. आयुक्तांनाच असतील आणि सगळे जर इथूनच होणार असेल, तिकडचे काही ऐकूनच घेणार नसतील, मग ते चार प्रभाग कार्यालय, चार प्रभाग अधिकारी आणि एवढा मोठा स्टाफ तिकडे कशाला बसवला आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सगळ्या प्रभाग समित्या बंद करा आणि इथे आणून बसवा.

**एस्.ए.खान :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब मी ७३ खाली पत्र दिलेले आहे. मला अजूनपर्यंत काही उत्तर देण्यात आलेले नाही. प्रभाग अध्यक्षांना काय काय अधिकार आहेत? प्रभागामध्ये काय-काय अधिकार आहेत? काही करत नाही. सगळे अधिकार इथेच असतील तर मग फायदा काय आहे? आम्ही ठराव करून दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सर्व नगरसेवक/नगरसेविका, आपल्या मताशी मी सहमत आहे. या ठिकाणी मा. आयुक्त नसल्यामुळे आपण बोलण्यात काही अर्थ राहणार नाही. हा आपला सर्वांचा प्रश्न आहे.

**( सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी , मा. उपायुक्त श्री. सुधीर राऊत यांना नेमलेले आहे. त्यांनी खुलासा करावा.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) ) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. आज मा. ्आयुक्त साहेब दिल्लीला नागरी पुनारूत्थान अभियानाच्या संदर्भात आहलुवालिया समितीच्या अहवालावर एक उच्चस्तरिय बैठक आपल्या शहर विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी विज्ञानभवनला बोलवलेली आहे. ती बैठक सकाळी दहा वाजल्यापासून सुरू झालेली असेल. आणि पूर्ण दिवसभर ती बैठक आहे. याकरिता तातडीने ते दिल्लीला गेले आणि संध्याकाळी पर येणार आहेत. त्या दरम्यान अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर बैठक असल्यामुळे त्यांना जाणे भाग होते. त्या संदर्भात त्यांनी मा. महापौर महोदयांना पूर्ण कल्पना दिली होती. आणि तद्नंतरच ते त्या बैठकीला गेलेले आहे. त्यामुळे मी सध्या इथे.........

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्हाला मा. महासभेमध्ये बसायला चार्ज देऊन गेले आहेत का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) ) :-**

ते अनुपस्थित आहेत, आज गेलेले आहेत, त्याअर्थी मी इथे मा. उपायुक्त (मु.) म्हणून त्यांच्या चेअरवर बसलो आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग त्या अर्थी तुम्ही उत्तरे द्या. नगरसेवकांनी जे प्रश्न विचारले आहेत. त्याची उत्तरे द्या.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) ) :-**

त्याची उत्तरे ज्या-ज्या विभागाशी संबंधित आहेत, त्या विभागाने द्यावी. अणि त्यानंतर जी उत्तरे माझ्या अखत्यारितील आहेत, ती मी देईन.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रभाग समिती क्र. ०३ मध्ये आजपर्यंत ज्या मिटींग झाल्या त्याच्यामध्ये विकासकामाची यादी अजूनपर्यंत का डिक्लेअर झालेली नाही. नगरसेवकांनी वारंवार मागणी केलेली आहे की, आमचा प्रभाग निधी आम्हाला आमच्या प्रभागामध्ये वापरायचा आहे. तर ती कामे का घेतली गेली नाहीत? आणि त्यामध्ये श्री. खांबित आणि इतर ज्युनिअर इंजिनिअर यांनी व्हिजीट मारून एस्टीमेट तयार करून दिलेले आहे. तरीसुध्दा ती कामे का घेतली नाही याचा मला खुलासा पाहीजे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मी बोललो की, साहेबांनी कालच व्हिजीट केली. आत्ता जी कामे, सगळी कामे तुमच्याकडे पाठवतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जेवढी नगरसेवकांची कामे आहेत, नगरसेवकांनी सुचवलेली सगळी कामे पाहिजेत. त्यामध्ये हे काम करायचे किंवा नाही करायचे हे कमिशनरनी सांगायचे नाही. नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी कुठे वापरायचा ते नगरसेवकांचे अधिकार आहेत.

**दिपक खांबित :-**

तुम्ही दिलेली कामे साहेब बघणारच ना? त्यांना सही करावी लागते. ते बघून तुमच्याकडे पाठवतील.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कधी बघणार?

**दिपक खांबित :-**

दोन दिवसामध्ये. कालच तर सगळी पाहणी झाली.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काल पाहणी झाली, मग पुढच्या मिटींगमध्ये येतील?

**दिपक खांबीत :-**

सोमवारपर्यंत तुमच्याकडे गोषवारा येईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पुढच्या मिटींगमध्ये ते कोणत्याही परिस्थितीमध्ये घ्यायला सांगा.

**दिपक खांबित** :-

मला वाटते तुमच्या वॉर्डमधील कामे मंजुर झाली आहेत.

**(सभागृहात गोंधळ )**

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या लोकांनी पत्र दिली आहेत, त्यांच्याबाबतीत तुम्ही काल फिरून बघितले. पण ज्यांची पत्रे नाहीत त्यांच्या बाबतीत काय होणार आहे?

**विजया वैती :-**

मला इथे खुलासा करावा की, टेंडर निघालेली कामे का कॅन्सल केली?

**दिपक खांबित :-**

२० ते २५ नगरसेवकांनी कामाकरिता पत्रच दिलेली नाहीत. नगरसेवक निधीचे पत्र दिले नाही किंवा प्रभाग समितीचे पत्र दिलेले नाही.

**स्नेहा पांडे :-**

लेकिन जो काम पास है। टेंडर भी निकल चुका है। वो क्यों कॅन्सल किया गया?

**प्रेमनाथ पाटील** :-

श्री. खांबित साहेब, प्रभाग समिती क्र. ०२ मध्ये किती कामे पास झाली?

**(सभागृहात गोंधळ)**

**दिपक खांबित :-**

तिकडे भुयारी गटार योजनेकरिता दोन्ही रस्ते खोदायचे आहेत. म्हणून आपण ती वर्क ऑर्डर दिली नाही.

**वंदना पाटील :-**

ते कधी खोदणार?

**दिपक खांबित :-**

अंडरग्राऊन्ड ड्रेनेज स्किमकरिता त्या रस्त्यावर पाईपलाइन टाकायची आहे.

**स्नेहा पांडे :-**

निकला हुआ टेंडर क्यों कॅन्सल किया?

**दिपक खांबित :-**

दोन्ही रस्ते दहा फुट खोल खोदायचे आहेत.

**कांचन पुजारी :-**

आम्ही जे लेटर दिले आहे त्याचे काय झाले?

**दिपक खांबित :-**

तुमच्याही कामाची साहेबांनी काल पाहणी केली. हैदरी चौक ते नरेंद्र पार्कचे गटार श्रीम. कल्पना ठाकूर मॅडमचे, सगळयांची कामे काल मा. आयुक्त साहेबांनी बघितली.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

काल तुम्ही सर्व बघायला गेले, तीस फुट रोड, साठ फुट रोड, नव्वद फुट रोड बघितले का?

**दिपक खांबित :-**

बघितले.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हे कधी रिपेअर होणार?

**दिपक खांबित :-**

नव्वद फुट रोडला पाईपलाईनचे काम आत्ता सुरू होत आहे. त्यामुळे ते नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

भाईंदर ते उत्तनपासून सगळे रस्ते दिवाळीपूर्वी झाले पाहिजे. नाहीतर पुढच्या मिटींगला इथे काय होणार ते बघून घ्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिता पाटील :-**

माझ्या वॉर्डमध्ये काम पास झालेले, टेंडरिंग झाले. तेसुध्दा थांबविण्यात आले. त्याचा खुलासा करावा. पेणकरपाडा वॉर्ड क्र. ७९..........

**दिपक खांबित :-**

तिकडे पाईपलाईन टाकायची आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मधुसुदन पुरोहित :-**

श्री. खांबित साहेब, म्हणजे पूर्ण ७९ वॉर्ड मा. आयुक्त साहेब स्वतः फिरणार, ते पाहणी करणार.........

**दिपक खांबित :-**

काल पाहणी करुन झाली.

**मधुसुदन पुरोहित :-**

माझ्या वॉर्डमध्ये झाली नाही.

**मिलन पाटील :-**

श्रीम. वंदना पाटील गेले सहा महिने ओरडत आहेत. तुम्ही त्यांच्या वॉर्डमध्ये अजूनही कोणतेही काम करत नाहीत. तुम्ही उद्या लेखी द्या की, त्यांच्या वॉर्डमध्ये काय कामे होणार आहेत आणि काय होणार नाहीत.

**वंदना पाटील :-**

२००८ पासूनची पत्र आहेत. तुम्ही निघालेले टेंडर कॅन्सल केले.

**दिपक खांबित :-**

लेखी उत्तर देण्यात येईल.

**वंदना पाटील :-**

आम्ही लोकांना काय उत्तर द्यायचे. तिथे दरवर्षी पाणी भरते. आज तिथे रोडची हालत तुम्ही बघा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आज सभागृहामध्ये सर्व नगरसेवकाचां बांधकाम डिपार्टमेंटसाठी एवढा गोधळ चालु आहे. आम्हाला हे इंजिनिअरशी बोलण्यापेक्षा आज आमच्या सभागृहामध्ये मा. महापौर आहेत, मा. उपमहापौर आहेत, मा. सभागृह नेता आहेत, मा. विरोधी पक्षनेता आहेत, मा. स्थायी समिती सभापती आहेत, आपण सर्व या मुद्यावर मा. कमिशनर साहेबांना का सांगत नाहीत? सभागृहाला कशाला एवढा गोंधळ करायला पाहिजे. मा. उपमहापौर साहेब, आपण इथे बसून पाच सदस्यांनी ही कामे कमिशनरकडून करुन घ्यायला पाहिजेत कशाला एवढा गोंधळ पाहिजे. तुम्ही भुमिका का घेत नाहीत? तुम्ही आम्हाला निर्णय द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खांबित साहेब, किती नगरसेवकांनी पत्र दिलेली आहेत आणि किती जण बाकी आहेत त्याचा खुलासा करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. उपमहापौर साहेब, हे सांगणार आणि कामे होणार का? मा. महापौर आणि मा. उपमहापौर बोलु शकत नाही का? आपण कशाला वर बसलेले आहात? यांनी सांगणार ते होणार. मा. महापौरांचे आणि उपमहापौरांचे वर काही नाही? महानगरपालिकेमध्ये हा सगळाच निर्णय चुकीचा होतो. मा. उपमहापौर साहेब, स्टॅन्डीग कमिटीला मा. आयुक्त येत नाहीत. मी मा. सभापतींवर ऑब्जेक्शन घेतले. जोपर्यंत कमिशनर बसत नाहीत, तोपर्यंत स्टॅन्डीग कमिटीची मिटींग घेऊ नका. आज दुसऱ्या मिटींगला कमिशनर नाहीत आणि स्टॅन्डीग कमिटीला श्री. सुधीर राऊत साहेब येतात. एका शब्दाने बोलत नाहीत. ज्या ज्या डिपार्टमेंटचा विषय येईल, ते अधिकारी बोलतात. हे फक्त नामानिशी बसतात. आजपण मा. महासभेमध्ये आले. गेल्या मा. महासभेमध्ये एक शब्द बोलले नाहीत. यांची जबाबदारी नाही का? मा. महापौर साहेब, हे तुम्ही बोलायला पाहिजे. अशा अधिकाऱ्यांना महानगरपालिकेमध्ये ठेवले नाही पाहिजे. तुम्ही निर्णय घ्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**एस. ए. खान :-**

आम्ही प्रभाग समितीमध्ये जे ठराव करुन इकडे पाठवतो, त्याची अंमलबजावणी होत नाही. आम्ही नगररचनाकडे एक ठराव शिफारस केलेला आहे की, मा. महासभेमध्ये एकची बांधकाम परवानगी रद्द करा काहीच गोषवारा अजूनपर्यंत दिलेला नाही. म्हणजे प्रभाग समितीची काही व्हॅल्यु नाही का? मग कशाला आम्ही प्रभाग समितीची बैठक घ्यायची आणि ठराव करायचे? आणि प्रभाग समितीमध्ये डी.एम.सी. येत नाहीत, मग आम्ही फक्त नगरसेवकांनी बसायचे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सर्व नगरसेवक, नगरसेविका, आपल्या मताशी मी सहमत आहे. माझेही काम याठिकाणी पेन्डीग आहे आणि म्हणून मी परवा मिटींग बोलावून मा. आयुक्तांना सांगितले की, नगरसेवकांनी ही जी कामे मागणी केली आहेत, ती संपूर्ण कामे झाली पाहिजेत. या ठिकाणी तुमच्या खिशातील पैसे द्यायचे नाही.

फंडातून दैसे द्यायचे आहेत आणि पुढच्या मिटींगला मा. आयुक्त नसतील तर त्यांना मी याठिकाणी महानगरपालिकेत ठेऊन घेणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, त्यांना कामे करायची नसतील तर त्यांना त्यांच्या घरी पाठवून द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

संबंधीत अधिका-यांना सांगा की, ज्या-ज्या नगरसेवकांनी लेटर दिले आहेत. त्यांचे एस्टीमेट तयार करुन..........

**मा. महापौर :-**

ज्या नगरसेवकांनी लेटर दिले नसतील त्यांनी ताबडतोब दोन दिवसात द्या आणि सर्वांची कामे करुन घ्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, अधिका-यांना सांगा की, तांत्रिक बाबी तपासा. कामाची पसंती नगरसेवकांची असेल. जी कामे सुचवतील, ती कामे तुम्हाला करावी लागतील.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही रुलींग द्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, जनतेसमोर आम्हाला जावे लागते, कमिशनरला जावे लागत नाही. तर आमची पसंती पाहिजे. टेक्नीकल काही असेल ते त्यांनी बघून घ्यायचे.

**मा. महापौर :-**

टेक्नीकल काही असेल ते अभियंत्यांनी बघून घ्यायचे आहे. ती जबाबदारी तुमची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा महत्वाचा विषय आहे. भाईंदर वेस्टला गणपती विसर्जन मोठ्या प्रमाणावर होते. धक्का माझ्या प्रभागामध्ये येतो. विसर्जनाच्या वीस दिवस अगोदर मी मा. आयुक्त, पोलीस वगैरे सर्वांना पत्रव्यवहार केला. शेवटच्या एक तारखेपर्यंत, म्हणजे एक तारखेला गणपती बसणार, मा. आयुक्त स्वतः जाऊन आले त्याबद्दल मला काही ना नाही. परंतु वीस दिवसात कोणतीही कार्यवाही झाली नाही. तिकडे रेल्वे प्रशासनाची जागा असल्या कारणाने त्यांचा अधिकार आहे. रेल्वे प्रशासनाला मनवून सगळे काम करुन घ्यावे लागते. अक्षरशः दोन दिवस जे.सी.बी. चालला. मा. आयुक्तांनी फक्त तीस हजार मंजुर केले. आम्हाला पोकलनने तीन दिवस माती उचलावी लागली. आज शहरामधील सगळे रस्ते पडून आहेत. श्री. सुधीर राऊत साहेब, आपण आता बोलतात की, मला इकडे बसवले आहे. त्या डिपार्टमेंटने उत्तर द्यावे. पण इथे तुम्ही या संपूर्ण महापालिकेच्या प्रशासनाचे प्रमुख म्हणून बसलेले आहात. तुम्ही जेव्हा त्या खुर्चीवर स्थानापन्न होता, तेव्हा तुम्ही त्या प्रशासनाच्या अधिका-यांना आदेश द्यायचे आहेत आणि या शहरामध्ये, या मा. महासभेमध्ये आपले शहर अभियंता हजर आहेत. जबाबदार अधिकारी या नात्याने शहर अभियंत्यांनी काय केले, याचे उत्तर या सभेत आम्हाला महापालिकेत पाहिजे. ते मेंडेटरी आहे. शहरामधील सगळे रस्ते अक्षरशः पहिले वर्ष असे आहे की, शहरातील रस्ते गणपती नंतरसुध्दा सगळे खड्डेच खड्डे. आता आपला ह्याच विषयामध्ये सानुग्रह अनुदानाचा विषय आहे. त्या सानुग्रह अनुदानाच्या वेळेला हेच नगरसेवक अधिका-यांची संपूर्ण लागुलचालन करणार. पण मला एक सांगा, पाणी खात्याने खणलेले खड्डे, आठ आठ महिने बुजवलेले नाहीत. तुमच्या रिलायन्स एनर्जीबद्दल जे काही खड्डे आहेत ते अजून आठ-आठ महिने बुजवलेले नाहीत. पाणी खात्याने रस्त्याच्या क्रॉस जो खड्डा मारला आहे, ते मे महिन्याच्या अगोदर पासूनचे खड्डे अजून बुजवलेले नाहीत. सगळीकडे पावसाळ्याच्या अगोदर जे रस्ते महापालिकेने, सगळ्या डिपार्टमेंटने खड्डे पडलेले होते. ते बुजलेले नाहीत. याच्यासाठी यांच्याकडे काय कारण आहे? राहता राहिला, मघाशी श्रीम. प्रभात पाटील यांनी एक विषय मांडला. सभागृहात गोंधळ चालु होता. श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब जेव्हा स्टॅन्डीगला मा. सभापती होते आणि मी मेंबर होतो. त्यावेळेला पहिला माझा प्रस्ताव आहे आणि तुमच्या प्रभागामध्ये जी कामे झाली. तुमचे जे ऑक्ट्रायचे बजेट आहे. त्याच्यातील दहा टक्के रक्कम ही संपूर्णपणे इंडस्ट्रीच्या विकासासाठी खर्च करावी असा ठराव झाला आहे. सुदैवाने आज मा. सभापती उपस्थित आहेत. त्यानुसार एका बजेटमध्ये ते खर्चपण झाले. त्यानंतर ते लेखाशिर्ष कमी केले गेले. याचे पहिले प्रशासनाकडून उत्तर घ्या. बजेटच्या पुस्तिकेमध्ये जो लोड तुम्ही तयार करता, तो डिलीट करायचा अधिकार कोणाला आहे? ते इकडे पहिला नमुद झाले पाहिजे. आणि तो कुठल्या अनुषंगाने केला? आज एल.बी.टी. आले. एल.बी.टी. ची दहा टक्के रक्कम तुम्ही तिकडे वर्ग करा आज तसे काही केलेले नाही आणि राहिता राहिला सगळ्या नगरसेवकांचा प्रभागनिधी आणि नगरसेवक निधीचा भाग, सरकारच्यावतीने राज्यशासनाने जी.आर. काढलेला आहे. नगरसेवकांनी कुठल्या कामाची नोंद करायची आणि महापालिकेच्या मा. आयुक्तांनी कुठली कामे मंजुर करायची. मा. आयुक्तांनी आम्हाला मंजुरी द्यायची गरज नाही. राज्य सरकारने ऑलरेडी आम्हाला मंजुरी दिलेली आहे. मा. आयुक्तांनी फक्त बघायचे आहे की, काम कुठे होते? राहता राहिला पेव्हर ब्लॉकचा विषय, एका नगरसेविकेच्या विरोधात मी तक्रार केली

आहे. आमच्या वॉर्डमध्ये खाजगी जागेमध्ये, खाजगी सोसायटीमध्ये, ती जागा महापालिकेची नसतानासुध्दा महापालिकेच्या वतीने पेव्हर ब्लॉक लावले. अडीज ते तीन लाख खर्च केला गेला. त्याचे बोर्ड लावले आहेत. ती चौकशी अजुन चालु आहे. अशी काही प्रकरणे असतील तर आपण करु नका आणि जी.आर. नुसार असेल आणि मा. आयुक्त तुम्हाला अडवत असतील तर जी.आर. चा आधार घेऊन सभागृहामध्ये निर्णय घ्यायला तुम्ही मोकळे आहात. राज्यशासन महत्वाचे आहे, मा. आयुक्त नाहीत. हे माझे ठाम मत आहे. सिटी इंजिनिअरला तो जी.आर. काढायला सांगा आणि त्या जी.आर. मध्ये वाचन करायला सांगा की, कोणकोणती कामे आहेत आणि मग मा. आयुक्त याला कोणत्या आधारावर नकार देतात ते बघू. तो जी.आर. मागवा म्हणजे सभागृहातील वाद मिटेल.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त आजच्या मिटींगला गैरहजर आहेत. त्याबद्दल मला बोलायचे आहे. ७४ वी घटना दुरुस्ती झाली त्यामध्ये प्रभाग कार्यालयांना अधिकार देण्यात आले. नगरसेवकांनी एखादे काम प्रपोझ केल्यानंतर उपअभियंता दर्जाचा अधिकारी जर मंजुर करत असेल, तर मा. आयुक्तांनासुध्दा नामंजुर करण्याचा अधिकार नाही, याचीसुध्दा नोंद घ्या. आज सचिव साहेबांनी शासनाचे बरेचसे जी.आर. आपल्याजवळ दिलेले आहेत. २८ मार्चला एक जी.आर. आलेला आहे. त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका ही “ड” वर्गातील महानगरपालिका आहे आणि त्याच्यासाठी एक ॲडीशनल कमिशनर हे पद मंजुर करुन शासनाजवळ पाठवायचे आहे. ज्यायोगे या ज्या महत्वाच्या मिटींग असतील, ते ॲडीशनल कमिशनर अटेंड करु शकतील आणि कमिशनर हे जनरल बॉडी किंवा इतर ज्या मिटींग आहेत, त्या अटेंड करु शकतील. या अनुषंगाने महापालिकेने काय कार्यवाही केली आहे? हा जो २८ मार्चचा जी.आर. आलेला आहे तो तुम्ही आज आम्हाला दिला. पण तुमच्याजवळ तर अगोदर आला असेल ना? मग त्या अनुषंगाने काय कार्यवाही केली?

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी आपल्याला दिलेला नाही. त्यांना कार्यवाही काय करायची आहे. कार्यवाही आपल्याला करायची होती. त्यांनी जी.आर. आजच दिला.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. या संदर्भात जी कमिशनर कॉन्फरन्स मा. मुख्य सचिवांकडे गेल्या आठवड्यात झाली तेव्हा मा. मुख्य सचिवांनी निर्णय घेतलेला आहे की, मा. महासभेवर विषय द्यायचा. ती टिप्पणी सामान्य प्रशासन विभागाने मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीकरीता ठेवलेली आहे. फायनल मुंजरीकीरता पुढच्या मा. महासभेमध्ये हा विषय येतो आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत यांनी जी सुचना मांडलेली आहे की, राज्य शासनाने अतिरिक्त आयुक्ताचे पद या ठिकाणी मंजुर केलेले आहे. आणि आपण आता या ठिकाणी पाहतो की, सन्मा. आयुक्त महोदयांना बरीच कामे आहेत. त्यामुळे ते एकटे प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहू शकत नाहीत. जर आपल्याला ॲडीशनल कमिशनर मिळाला, तर ब-याच अंशी आपले काम पूर्ण होऊ शकते. लोकप्रतिनिधी काम मार्गी लावू शकतात. सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत यांनी जी सुचना मांडलेली आहे. मला वाटते आजच्या सभेतच आपण त्यांची सुचना, सुचनारुपाने ठराव घेऊन आम्ही अनुमोदन देत आहोत आणि तो प्रस्ताव तातडीने शासनाला पाठवा. आम्हाला आवश्यकता आहे. आजच्या आजच आम्ही एक पत्र मा. महापौरांच्या सहीने पाठवून देऊ.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. माझ्या ऑफीसच्या समोर जो मेन रोड आहे, त्याच्यावर पन्नास वेळा खडी टाकली आणि त्या खडीवर डांबरीकरण होत नाही. त्याच रोडने रोज मा. महापौर साहेब येतात जातात. कमिशनर साहेब येतात जातात. तिथे रोज दगड उडतात आणि कोणी ना कोणी जखमी होतो. त्याच्यावर डांबरीकरण का करत नाही? याचा खुलासा करावा. आज पावसाळ्यामध्ये प्रश्न विचारला तर बोलतात की, पावसाळा जाऊ द्या. मग त्याच्यावर डांबरीकरण करतो. आज किती तरी लोक जखमी होत आहेत. त्याच्यावर डांबरीकरण कधी करणार?

**दिपक खांबित :-**

चार - पाच दिवसात होईल?

**आसिफ पटेल :-**

पावसाळा गेल्यानंतर दुस-या दिवशी करणार होते. रोज चार पाच दिवस बोलता. भाईंदर वेस्टमध्ये थोडासा खड्डा झाला की, तुम्ही ताबडतोब डांबरीकरण करता. इकडे आदिवासी लोक राहतात का? तिथे इतके दुर्लक्ष का चाललेले आहे. तुम्ही रोज त्याच रोडने येता आणि त्याच रोडने जाता.

**दिपक खांबित :-**

त्या रस्त्यावर आपण तो रस्ता उंच केला, ग्राउंटींग केले.

**आसिफ पटेल :-**

तिथे फक्त खडी टाकायचे काम केलेले आहे.

**दिपक खांबित :-**

चार-पाच दिवसात ते काम होईल.

**आसिफ पाटेल :-**

करायचे तुमच्या मनातच नाही. पाच दिवस, पाच दिवस बोलून पावसाळ्यात बंद झाले. तुम्हाला किती वेळा निदर्शनास आणून द्यायचे? तुम्ही त्या रोडनेच जाता, त्या रोडनेच येता. पण तिथे डोळे बंद करता का?

**दिपक खांबित :-**

त्याच्यावरुन ट्राफीक जायला पाहिजे होती. ट्राफीक गेली आता पाच-सहा दिवसात ते काम होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खांबित साहेब, माझ्या वॉर्डामधील पारसनाथ, जैन नगर, ललित विद्या निकेतन रस्ता आपण २००८ ला पास केलेला आहे. पण त्याचे काम अजून चालु होत नाही. त्याचे कारण काय ते पण आम्हाला जरा सांगा. तिकडे ललित विद्या निकेतन शाळा आहे. तीन इमारती आहेत. इमारतींची पण पत्र आपण पास केलेली आहे.

**दिपक खांबित :-**

तुम्ही स्वतः मा. आयुक्त साहेबांना घेऊन गेलेले. मा. आयुक्त साहेबांनी पुढच्या बजेटमध्ये घेऊ म्हणून स्वतः बोलले.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी धनेश हॉटेलचे सांगत नाही. धनेश वाईन शॉप, तिकडे ललित विद्या निकेतन स्कुल आहे. तिथे रस्ता आपल्या स्ट्रीट लाईट आहेत आणि बिल्डरने रस्त्याचे हस्तांतरण पण केलेले आहे. तो. श्री. धनेश धर्माजी पाटील, श्री. धर्माजी हरिश्चंद्र पाटील, श्रीम. यमुना धर्माजी पाटील यांनी तो रस्ता १९८२ ला विकलेला आहे. त्यांनी गेट लावलेला आहे. तिथे आपल्या स्ट्रीट लाईट आहेत, पाण्याच्या लाईन आहेत. पण तो रस्ता करुन देत नाही. तो कधी करणार त्याचा खुलासा करा. तो रस्ता २००८ ला पास झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

तो रस्ता खाजगी जागेमधून आहे. जागा मालकाचा विरोध आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्यांनी तो प्लान पास केलेला आहे. त्या जागेचा आणि त्याचा काही संबंध नाही. श्री. धनेगावे साहेबांनी विचारुन घ्या. त्याने त्या रस्त्यावर फक्त अतिक्रमण केलेले आहे.

**दिपक खांबित :-**

त्याबाबतीत कार्यवाही सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मला जरा कार्यवाहीचा खुलासा करावा.

**शशिकांत भोईर :-**

कोणत्या प्रकारची कार्यवाही सुरु आहे. त्याचा खुलासा करा.

**शरद पाटील :-**

श्री. खांबित साहेब, प्रभाग समिती दोनला जातो तो रस्ता कधीच होत नाही. का होत नाही?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्तांना तो पण रस्ता दाखवला.

**दिपक खांबित :-**

आपण या विषयावर शनिवारी किंवा सोमवारी मा. आयुक्तांकडे जाऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

ती फाईल पण बरोबर घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आज या सभागृहाच्या भावना बघितल्या तर सर्वांचे असे मत आहे की, सर्वांची कामे झाली नाहीत. आत्ता श्री. खांबित साहेब उत्तर देतात की, तुमचे काम झाले आहे. पण किती पत्र दिली. त्यातील किती टक्के पास झाले असेल. त्यांनी त्या पत्राचा उल्लेख केला की, हेच काम केले आहे. संपूर्ण कामे पास झाली ती सांगितली नाहीत. कारण मा. आयुक्तांनी बरीचशी कामे रद्द केलेली आहेत. मग आमच्या सदस्यांनी जी पत्र दिली आहेत. त्या सदस्यांची संपूर्ण कामे घेतली आहेत का हे त्यांनी सांगावे. त्यांनी फक्त सांगितले की, तुमची कामे घेतली आहेत. कोणती कामे घेतली? याचा ते उल्लेख करत नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौरांनी रूलिंग दिले आहे की, सगळी कामे होतील.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांची रूलिंग पण त्यांना कामे करायची आहेत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, हेच महत्वाचे आहे की, श्री. खांबित यांनी फक्त वेळ मारून नेली आहे. त्यांनी या सभागृहातील आजचे मरण हे उद्यावर ढकलून दिले आहे. सगळ्या नगरसेवकांची कामे रिजेक्ट झाली आहेत. प्रभाग दोन मध्ये चार पाच नगरसेवक सोडले तर खरे की, खोटे ते मला बोला. सगळ्यात जास्त नगरसेवक प्रभाग २ मध्ये आहेत आणि सगळ्यांची कामे रद्द झालेली आहेत.

**(सभागृहात गोंधळ)**

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

या सभेमध्ये आपण जी चर्चा करतो ती निरर्थक आहे. आपण जी चर्चा करतो त्यातून काही साध्य होणार नाही. कारण श्री. खांबित किंवा मा. उपायुक्त हे मा. आयुक्तांकडे जाऊन हे शब्द टाकणार नाहीत. ते बोलूच शकणार नाहीत. मघाशी श्री. आसिफ पटेल यांनी जो विषय मांडला की, मुख्य रस्त्यावर डांबरीकरण होत नाही. हे कोणी ठरवायचे? श्री. खांबित यांनी ठरवायचे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग इकडे येऊन फायदा काय?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आम्हाला ठेकेदार वेळ देतो की, आम्ही अमुक दिवशी डांबर टाकणार आहोत. याचा अर्थ काय? आपण या सभागृहामध्ये फक्त आर्थिक मंजुरी द्यायची. प्रशासकिय मंजुरी घ्यायची की, आपला विषय संपला. मग ते ठेकेदार आणि आमचे अधिकारी ठरवणार. ठेकेदाराला तुम्ही किती मुदत दिलेली आहे? काम कधी व्हायला पाहिजे? मुदतीमध्ये जर काम होत नसेल तर तुम्ही त्या ठेकेदाराला काय करता? तुम्हाला ते सांगतात की, आम्ही पाच दिवसात करणार याचा अर्थ काय? मी तुम्हाला का सांगतो की, मा. आयुक्तांसमोर हे लोक चर्चा करू शकणार नाहीत. मा. आयुक्तांना दिल्लीवरून सभेचे जे पत्र आले ते किती दिवस अगोदर आले? ते पत्र काल रात्री आले? म्हणजे ते आठ दहा दिवस तरी अगोदर आले असेल. त्यांची वेळ घेऊन सभा का लावत नाही? त्यांनी सांगायला पाहीजे की, या दिवशी मी नाही. पूर्वी कमिशनर नसताना आपण सभा तहकुब केलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

मी तेच सांगायला उभी राहिलेली आहे की, आजची सभा तहकुब करा आणि कमिशनर आल्यावर आजची चर्चा पुन्हा इथून सुरू करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आजची सभा तहकुब करा. जबाबदार अधिकारी नाहीत मग कशाला सभा घेता?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त(मु.)) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मा. उपमहापौर महोदय जे बोलले की, कार्यवाही अभियंता श्री. खांबित साहेब किंवा मी मा. आयुक्तांना हे सांगणार नाही. अर्थात त्यांचे हे म्हणणे मला एवढ्यासाठी पटलेले नाही की, सभागृहात जे काही होते त्याची स्वतंत्र्यपणे रेकॉर्डींग होतच आहे. त्या व्यतिरिक्त मी सुध्दा त्याचा गोषवारा लिहून घेतो. प्रत्येक सभेला, ज्या सभेला ते उपस्थित नाहीत. त्यांना सभागृहात जे काही झालेले आहे त्याचे पूर्णपणे ब्रीफींग मी यापूर्वी केलेले आहे. मा. स्थायी समितीमध्ये जे होते ते सुध्दा सांगतो. आणि किंबहुना आजच्या सभेमध्ये जे काही आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या किंवा सभागृहाच्या ज्या भावना आहेत, यासुध्दा सांगण्याचे माझे कर्तव्य आहे आणि निश्चित पार पाडणार. आणि त्याच्यामध्ये माझी जी भुमिका आहे, ती मा. आयुक्त नसताना जरी मी इथे बसत असेन तरीसुध्दा मा. आयुक्तांच्या वतीने किंवा स्वतंत्रपणे बोलण्याचासुध्दा जो काही माझा अधिकार आहे हा वापरून मी आत्ता निवेदन करतो की, माझ्या अखत्यारिमध्ये जे काही आहे, माझ्याप्रमाणे मी करू शकतो, ते मी करू शकणार आणि अन्यथा मा. आयक्त महोदयांकडे जे सांगायचे आहे ते सांगण्याचे माझे कर्तव्य आहे, ते देखील मी पार पाडेन.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग कार्यालयाच्या मिटींग एक-एक महिना अगोदर झाल्या. त्याच्यामध्ये हे सगळे प्रस्ताव पाठवले आहेत. प्रशासनाने काय केले? तुम्ही मा. आयुक्तांना रिपोर्टिंग केले का? प्रभाग समितीचे मा. सभापती तिकडे बसले आहेत. आमचे प्रभाग समितीचे ठराव झालेले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आज प्रत्येक प्रभाग समितीच्या मिटींग होऊन सहा-सहा महिने झाले. काय कार्यवाही झाली ते तुम्ही मला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग समितीचे ठराव तुम्ही मा. आयुक्तांपुढे टेंडर केलेले नाहीत.

**ज्योत्सना हसनाळे :-**

तुम्ही जबाबदार अधिकारी आहात तर तुम्ही उत्तर द्या. यांचा काही उपयोग नसेल तर यांना खुर्चीवर बसवून काय फायदा?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, आजच्या सभेचा एकंदर सुर पाहिला तर विकास कामे होत नाहीत ही नगरसेवकांची ओरड आहे. आणि हे शंभर टक्के खरे आहे. तुम्हीसुध्दा त्याच्यामध्ये आहात. मा. महापौर, मा. उपमहापौर, आपण सुध्दा आहात. परंतु, मा. उपमहापौर, श्री. जयंत पाटील यांचे स्टेटमेंट किंवा मी मा. सभागृह नेता म्हणून माझे जे उपरोधिक असे स्टेटमेंट आहे की, संबंधित अधिकारी हे तिथपर्यंत पोहोचवणार नाहीत. त्याच्यावर त्यांनी आपल्याला उत्तर दिले आहे की, मी माझे काम करणार आहे. त्यांच्यावर सुध्दा आपल्याला थोडासा विश्वास ठेवायला हरकत नाही. परंतु त्यांना मी मुदत देणार आणि सभागृहाच्या वतीने मी म्हणू इच्छिते, कृपया सर्व सन्मा. सदस्यांनी ऐकावे की, आजच्या सभागृहामध्ये जो कालवा झाला त्याचा संपूर्ण इतिहास किंवा इतिवृत्तांत ते मा. आयुक्तांना सादर करतील. आणि कमिशनर येणाऱ्या आठ दिवसात त्याच्यावर निर्णय घेतील अशी अपेक्षा करू. तेव्हाच ही सभा चालेल आणि नवव्या दिवशी आपल्या परिने महापालिकेला असहकार करण्यासाठी सर्वांनी तत्पर राहावे असे मी आपल्याला आवाहन करत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नगरसेवकांच्या वतीने जर मा. सभागृह नेता श्रीम. प्रभात पाटील जबाबदारी घेत असतील तर आम्ही आजची सभा होऊ देतो. पण एवढे लक्षात ठेवा. आजच्या सभेची जी कामे दिलेली आहेत, त्याहीपेक्षा महत्वाची कामे प्रत्येक प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागमाध्ये आहेत.

**(सभागृहात गोंधळ )**

**ज्योत्सना हसनाळे :-**

इथे जबाबदारी घेणारा अधिकारी नसेल तर ही सभा घेण्याचा काही अधिकार नाही.

**(सभागृहात गोंधळ )**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या प्रशासनाने केलेले एकतरी चांगले काम सांगा. नगरसेवकांचे चांगले काम आत्तापर्यंत काय केले आहे? आम्हाला वाटले आय.ए.एस. ऑफीसर आले आहेत. शहराचे काहीतरी चांगले होईल. काय चांगले झाले? पेपरमध्ये तुमच्याविषयी किती चांगले लिहितात ते बघा. सगळ्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. काय उत्तर द्यायचे? गणपतीमध्ये आम्ही लोकांना समजावले की, आत्ता नाही, नवरात्रीमध्ये होईल. नवरात्रीमध्येपण रस्त्यावर पॅचवर्क नाही. आम्ही लोकांना काय उत्तर द्यायचे? बाकीची कामे तुम्हाला बरोबर कशी सुचतात?

**विजया वैती :-**

आणि कॉन्ट्रॅक्टरनापण फोन केल्यावर ते फोनपण उचलत नाहीत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, नवीन कामे मंजुर घेण्यासाठी रस्त्याचे पॅचवर्किंग होण्यासाठी, बाकीच्या कामांसाठी लोकांची ओरड आहे. काही ठिकाणी कामे मंजुर झालेली आहेत. ठेकेदारांना कामे दिलेली आहेत. पण सवडीनुसार कामे करून लोकांना वेठीस धरले आहे. त्याचे काय करणार आहात? सगळ्या सदस्यांना माझी विनंती आहे. आपल्या सगळ्यांचा सारखाच विषय आहे. पण आपण आपसामध्ये कालवा केल्यामुळे हे कुठलेही उत्तर आपल्याला व्यवस्थितरित्या देत नाही.

**विजया वैती :-**

अगोदर पाऊस होता. आत्ता ऊन पडते आहे. कामे का होत नाहीत?

**लक्ष्मण जंगम :-**

पूर्ण सदस्यांच्या वतीने कोणीही दोन सदस्यांना आम्ही सांगू, त्यांनी बोलावे. मग ते कुठल्याही पक्षाच्या सन्मा. सदस्यांनी बोलावे. ज्यांना प्रशासन योग्य उत्तर देतील. आत्ता मला सांगा, मा. उपमहापौर साहेब, तुम्ही बोलले. बऱ्याचशा वेळेला मी मार्क केले आहे की, तुम्ही एवढ्या सदस्यांचा कालवा असताना सुध्दा योग्य मुद्दा घेता. आणि म्हणून तुमचा एक विषय माझ्या डोक्यामध्ये व्यवस्थित फिट आहे की, इथे आपण सभागृहाने यांना आर्थिक मंजुरी द्यायची. प्रशासकिय मंजुरी द्यायची. सगळे काही करायचे ठेकेदार नेमल्यानंतर ठेकेदारांनी आणि यांनी ठरवायचे की, काम कधी करायचे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या अधिकाऱ्यांना ठेकेदार फाट्यावर मारतात असे मी जाहीर सांगतो. यांच्यामधील कुठल्याही अधिकाऱ्याने उठून सांगावे की, आम्हाला मारत नाहीत. त्याला ठेकेदाराने किती वेळा धडकावले ते मी सांगेन. ही अतिशय वाईट गोष्ट आहे. म्हणून तुमच्या अधिकाऱ्यांचा जर या ठेकेदारांवर अंकुश नसेल, तर तुम्ही या शहराच्या हितामध्ये काम करू शकणार नाही. आणि नगरसेवकांची ओरड कायम राहिल. तुम्ही आम्हाला ज्यावेळेला इथे सांगता, सगळ्यांना माझी विनंती आहे, आपण आपसामध्ये भांडत बसतो. अधिकारी वरून तुम्हाला हसून सांगतात. म्हणजे आपला बालिशपणा तिथे दाखवला जातो ही गोष्ट लक्षात घ्या. तुम्हाला ही गोष्ट तोपर्यंत व्यवस्थितरित्या ऐकावी लागेल. तुमचा एखादा प्रश्न झाला तर त्यांच्याकडून विचारून घ्या. ठेकेदारांना तुम्ही जी-जी कामे दिलेली आहेत, आपण रामदेव पार्कचेच काम घेऊ. पावणे दोन कोटींचे काम दिलेले आहे. कामाची किती वर्षाची गॅरेंटी आहे? किती कालावधीमध्ये ते व्हायला पाहिजे? तुम्ही कधीपण मार्क करा. तुमच्या परिसरामध्ये तुमच्या वॉर्डमध्ये ज्यावेळेला काम होते, निव्वल जोराने पाऊस झाला की, ठेकेदार जोराने काम करतो. त्याच्या अगोदर कोणी करताना बघितला का सांगा. पावसामध्येच तुमचे काम का? जसे पावसामध्ये कर्मचारी, अवजार तुम्हाला

लागणारे मटेरिअल हे मिळत नाही. पण आपल्याकडे नेमके उलटे आहे की, बरोबर पावसामध्येच कामाला जोर पकडतो. पावसाच्या आधी करतच नाहीत. हे आत्तापर्यंतचे आमचे मत आहे. यावेळेला जर तुम्ही अशाच पध्दतीने आम्हाला रोज जर ओरडायला करत असाल, रोज जर असेच वेठीस धरणार असाल, तर त्या वॉर्डमधील जी संख्या आहे तेवढी सगळी आणून तुम्हाला ऑफीसमध्ये बसताना रोज वेठीस धरू. कमिशनर आय.ए.एस. असू द्या, कोणीही असू द्या. श्री. राऊत साहेब, मी मागच्या स्टॅण्डींगमध्ये सांगितले, तुमचे अधिकाऱ्यांचे जे रिपोर्टिंग आहे ते कमिशनर पर्यंत बरोबर नाही, असे माझे स्वतःचे मत आहे. तुम्ही एकमेकांच्या विरोधातील गोष्टीच सांगत बसता, असा आमचा अंदाज आहे. त्याच्यामध्ये किती खरे आहे ते शोधावे लागेल. आपण येणाऱ्या काळात शोधू. पण तुम्ही जर व्यवस्थितरित्या सांगितले की, या ठिकाणी काम झाले पाहिजे. ते अत्यावश्यक आहे. श्री. सुधीर राऊत साहेब, मी तुमच्याकडे आलो होतो, ते काम तुम्ही केले का? कमिशनर सुध्दा माणूसच आहे. समजूतदार माणूस आहे. चांगला माणुस आहे. या शहरातल्या सगळ्या नगरसेवकांनी त्यांना समजावून सांगण्याची गरज आहे. जर समजावून सांगितले तर अभ्यासू माणूस आहे. चांगले काम होईल. समजावण्याची पध्दत तुमची आणि आमची वेगळी असेल तर काय काम होणार नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**मधुसुदन पुरोहीत** :-

त्यांना भेटायलाच वेळ नाही फोन लावून बघा काम होत नाहीत.

**मिलन म्हात्रे** :-

बरोबर आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रत्येक वेळेला बोलणार बजेट नाही मग ही कामे करायला बजेट कुठून आणता.

**मिलन म्हात्रे** :-

मा. आयुक्त फोन घेत नाहीत. भाईंदर वेस्टच्या चौपाटीचं काम बंद केलं मिटींग तहकुब करा.

**(सभागृहात गोंधळ)**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी कधी बोलते का? परंतु काम होत नाही म्हणून बोलायला लागते.

**मा. महापौर :-**

आपण उद्या मा. आयुक्तांना भेटू.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त आज मिटींगला का आले नाहीत? यायला पाहिजे होतं ना. तुम्ही माझा अर्ज घेता का? माझी काम होत नाहीत.

**(सभागृहात गोंधळ)**

**मधुसुदन पुरोहीत :-**

मा. आयुक्त सांगतील तसे होईल का?

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक आपसामध्ये बोलू नका विषय चालू झाला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.५५, दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मधुसुदन पुरोहित** :-

मा. महापौर साहेब एवढी चर्चा झाली तर त्या कामाबद्दल काहीच नाही. मा. आयुक्तांना आमची व्हॅल्यु नाही ते महासभेला येत नाही स्टॅंडीगला येत नाही ह्याचा अर्थ काय?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कशाला बसवता त्यांना पाठवून द्या ना.

**मधुसुदन पुरोहित :-**

हे काम होणार नाही ते काम होणार नाही ह्याचा अर्थ काय?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांची सुद्धा किमत राहिली नाही. मा. आयुक्त आपल्या अंडरमध्ये रहायला पाहिजेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सचिव साहेब, काय लावलं आहे हे सगळे मुर्ख आहेत का? त्यांना बोलू द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपल्याला नक्की काय बोलायचं आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मला हे म्हणायचं आहे की आजच्या मिटींगला मा. आयुक्त साहेब नाहीत. जबाबदार म्हणून राऊत साहेबांना इकडे बसवलं आहे. राऊत साहेबांच्या वतीने खांबित साहेबांनी नगरसेवकांना उत्तर दिली की, ही

काम आज होतील, उद्या होतील, पाच दिवसांनी होतील, महिन्यांनी होतील. ती खरच होणार आहेत का? तर नाही म्हणून तुम्हीच मला खुलासा केला.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी तुमच्यासाठी बोललो की ह्या सभेमध्ये सगळ्याच्या मागण्या आहेत ना त्याचा काय उपयोग होणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काय उपयोग होणार नाही तर ह्या मिटींगचा अर्थ काय हे नगरसेवक बोलतात कशाला?

**मा. महापौर :-**

आयुक्त नसताना बोलतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

विशेष सभा लावा ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हे आपल्याला मान्य आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नगरसेवकाच्या कामाचा......

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सर्व सदस्यांना विनंती करतो की, आपल्या सर्वांच्या कामासाठी आपण खास सभा लावू या. फक्त कामासंबंधी विषय घ्या त्या विषयावर चर्चा करा मा. आयुक्त त्या सभेला असले पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

जी.आर. चं वाचन कोणी करत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्यांच्यासमोर बोलण्यात काय अर्थ नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते रिर्पोटींग करणार आहेत ना?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

पुढचा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सिटी इंजिनिअरला जी.आर. चे वाचन करायला सांगा म्हणजे मा. आयुक्त साहेब नियमात करतात की अनियमात करतात ते आपल्याला कळेल.

**प्रभात पाटील :-**

दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, अनुपालन अहवालावर बोलायचं आहे. २० जून आणि २० जूलैचे दोन ठराव केले होते. त्याचे अनुपालन अहवाल अजून मिळाले नाहीत काय कारण आहे. २० जून आणि २० जूलै चे नोकरभरतीवर महासभेत ठराव झाले होते.

**नगरसचिव :-**

मागच्या सभेत दिले आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

ते आतापर्यंतच मिळाले नाहीत. त्याच पुढे काय झाले. उपमहापौर साहेब, आपण समाज विकास अधिकाऱ्यावर ठराव केला होता त्याचा अहवाल अजून मिळाला नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आपले स्थानिक आमदार गिल्बर्ट जॉन मेंडोंसा त्यांनी लता अपार्टमेंटची जी दुर्घटना घडली त्याच्या मृत नातेवाईकांना एक लाख रुपये आणि जखमींना २५,०००/- रुपये महापालिकेने द्यावे अशी मागणी केली आहे. त्याच महापालिकेने काय केलं आमदार साहेबांनी मागणी केली अजून दिले का नाही? मदत लवकरात लवकर पोहोचवा. या संदर्भात मा. उपमुख्यमंत्री आणि प्रधान सचिव बेंजामीन साहेब ह्यांना या संदर्भात आमदार साहेबांनी पत्र दिलेलं आहे की, मिरा भाईंदर मध्ये ज्या धोकादायक इमारती आहेत. त्यांना वाढीव चटई क्षेत्र द्यावं या संदर्भात महापालिकेने एक ठराव पारित करुन पाठवावा. आमचं शिष्ट मंडळ तिकडे गेलेलं तर स्वतः बेंजामीन साहेबांनी आमदार साहेबांना सांगितलं मा. महापौरांना विनंती आहे की, आमदार साहेबांनी जे पत्र दिलेलं आहे. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, नगरविकास राज्यमंत्री भास्कर जाधव

साहेब, आणि प्रिंन्सीपल सेक्रेटरी बेजामिन साहेब ह्यांनी जी सुचना केली आहे की महासभेने असा फ्रेश प्रस्ताव पाठवावा की एक्झीस्टींग प्लस वन म्हणजे शासन ह्याच्यावर निर्णय घेईल.

**भगवती शर्मा :-**

चर्चा क्या हुई थी जैसे धोकादायक बिल्डींग है उसके अंदर मे खाली करने को नोटीस देते है। उसको खाली करते है। जैसे लता अपार्टमेंटमे २१६ टेनेन्ट को खाली कर दिया। शहर के अंदर वो रहने को कहाँ जाए। रिडेव्हलपमेंट करने को जाते है तो रिडेव्हलपमेंट के अंदर एफ.एस.आय. मिलती नही है। अनेक बिल्डींग को खाली करने के लिए मा. आयुक्त ने नोटीस दिया २-४ वॉर्ड खाली कर दिया गंभीर विषय था की, वो कहाँ जाए। बिल्डींगे खाली होगी रि-डेव्हलपमेंट होगा नही तो इस विषय मे एक्झीस्टींग एफ.एस.आय. ढाई तीन चार लागोंने युज किया है और अपने पास तरतुद नही है। इसिलिए प्रधान सचिव ने आमदार साहब को रस्ता बताया था की, सभा के अंदर मे विषय लेकर ठराव किजिए। जो ६६ इमारते है उसके एक्झीस्टींग एफ.एस.आय. प्लस वन एफ.एस.आय. ताकी कोई भी रिडेव्हलपमेंट करे असको बेनिफिट मिल सकता है। उसके लिए वो करेगा इनको रहने को घर मिल सकता है। इसिलिए आपको निवेदन है की अगली महासभा मे यह विषय लेके उसका ठराव जल्द से जल्द भेजेंगे ताकी यह ६६ इमारतो का पुर्नभविष्य है वह निर्धारीत हो सके।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ह्याच्यामध्ये माझ्या वॉर्ड मधली महेश नगर मोठी बिल्डींग अशी जीर्ण झाली होती. आता आपण घोषणा वगैरे केली. मदत डिक्लेर केली मी मा. आयुक्तांना कल्पना दिली होती की, आपण महापालिकेच्या वतीने एक ठेकेदार नेमावा. त्यांना टेंडर द्यावं ती बिल्डींग परझड झाली आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. मिलन म्हात्रे साहेब, प्रधान सचिवांनी असं सांगितलं आहे की, मिरा भाईंदर महापालिकेचे ठराव रितसर विषय आणून त्यावर आपण चर्चा करु. आता इथे चर्चा करण्यात अर्थ नाही ते ठराव करुन शासनाकडे पाठवू आणि ते ठराव त्यांनी मागितले आहेत त्यांनी स्वतःहून सांगितलं आहे त्याशिवाय या चर्चेला काय अर्थ राहणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय बोलतो ते ऐका.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुमचं म्हणणं मला कळलं त्या सभेमध्ये आपण चर्चा करुन ठराव करु.

**मिलन म्हात्रे :-**

विशेष सभा लावा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

पून्हा ठराव करायचे का? ठराव सांगितला ना तर करुन टाकू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. भगवती शर्मांनी सांगितलं मुख्यमंत्र्यांकडे फक्त सहीसाठी बाकी आहे. त्या गोष्टीला तीन वर्ष झालेली आहेत. आपले दोन प्रस्ताव गेलेले आहेत हेच विषय गेलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

दादा, मी जे बोलतो ते ठरावात इन्क्लुड करण्यासाठी बोलतो. आमच्या इकडचं बिल्डर अमेरीकेला पळून गेला आहे. लोक रस्त्यावर आली. बिल्डींग पडायची अवस्था आली. ठेकेदार नेमून आम्ही ती बिल्डींग व्यवस्थित पाडून घेतली. जिवितहाणी झाली नाही. अडीच तीन लाखाचे टेंडर निघाले मेन रोडवरच बिल्डींग तीन साईडला प्रमुख तीन रस्ते आहेत त्या ठरावात सगळं नमुद करायला पाहिजे. कारण तुमचे लोकांचे आपसात काय ठराव होतात ते आम्हाला कळतच नाही. पूर्वी मा. महापौर गटनेत्यांना बोलवायचे परंतु तीन-चार वर्ष झाली ती पध्दत बंद करुन टाकली.

**मा. महापौर :-**

विषयाचं बोला.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाच्या पलिकडे बोलत नाही. गटनेत्यांना बोलवत होते ते वेडे नव्हते. तुम्ही लोक बोलवत नाहीत. गटनेत्यांची बैठक महासभेच्या अगोदर झाली पाहिजे. तुम्हाला आम्ही सपोर्ट केला आहे हे लक्षात घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, अनुपालन अहवाल मिळाला नाही. २० जून आणि २० जूलै च्या ज्या महासभा झाल्या होत्या त्याचा अनुपालन अहवाल मिळाला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, माझ्या वॉर्डातील बी.पी. रोड वरील हिरा पन्ना बिल्डींग आणि गायत्री नगर अत्यंत धोकादायक झालेल्या आहेत ते लवकर तोडण्याचे कारवाई करा त्या कधीही पडू शकतील.

**मा. महापौर :-**

६६ बिल्डींगला १९९३ ला नोटीस दिली आहे. ती बिल्डींग काल कोसळली.

**प्रेमनाथ पाटील :-**

माणसं मरायची वाट बघता का?

**मा. महापौर :-**

कोर्टात जाऊन त्यांनी स्टे आणला. आपला विषय कुठल्या कुठे जातो.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या विषयासाठी सविस्तर मिटींग लावा.

**मा. महापौर :-**

मिटींग लावली तरी आपसामध्ये चर्चा करतात आपले जे विषय आहेत अधिकारी फायदा घेऊ बघतात तुम्ही आपसामध्ये लढा तुम्ही मोजकचं बोला.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, अनुपालन अहवाल मिळाला नाही.

**नगरसचिव :-**

पुढच्या मिटींगला तपासून देतो.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृहासमोर आला पाहिजे. मा. महापौर तुम्ही आदेश दिले होते त्याचा अहवाल मिळाला नाही पुढच्या महासभेमध्ये तो अहवाल मिळाला पाहिजे.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, जो प्रस्ताव ह्यांनी सांगितलं. ना त्याची ही प्रोसेडिंग आहे. दि. १८/०७/२००९ ला हा प्रस्ताव ह्या मिटींगमध्ये झाला होता. आणि तो मुख्यमंत्र्याकडे फायनल स्टेजला असच मा. आयुक्तांनी उत्तर दिलेल होत.

**प्रकरण क्र. ५५ :-**

दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५८ :-**

दि. १५/०२/२०११, १७/०२/२०११, दि. ३०/०३/२०११ व दि. २०/०४/२०११ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**प्रभात पाटील :-**

१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे शितलनगर हा ६९०.०० मीटर लांबीचा व १८.०० मीटर रुंदीचा विकास आराखड्यातील रस्ता आहे. सदर रस्ता हा नादुरुस्त असून रस्त्यावर पावसाळ्यात पूर्णपणे पाणी साठत आहे. सदर रस्ता १० वर्षापूर्वी विकासकामार्फत तयार करण्यात आलेला आहे. तेव्हापासून फक्त दुरुस्ती कामे करण्यात येतात. सद्यस्थितीत भुयारी गटार योजने अंतर्गत रस्ता खोदल्याने रस्त्याच्या मधोमध ८.०० मीटर रुंदीचे खडीकरण व ग्राऊटींग करण्यात आलेले आहे. उर्वरीत रुंदीचा व डांबरीकरणाचा रस्ता तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु. ६८,४८,३००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) मिरारोड (पूर्व) सिनेमॅक्स ते रामदेव पार्ककडे जाणारा रस्ता हा ४०० मीटर लांब व १८.०० मीटर रुंदीचा आहे. सदर रस्ता भुयारी गटार योजने अंतर्गत खोदल्याने सद्यस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी ६.०० मीटर रुंदीचा खडीकरण व ग्राऊटींग करण्यात आलेले आहे. उर्वरीत रुंदीचा रस्ता खराब असून त्यावर खडीकरण व संपूर्ण रुंदीकरण डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु. ७२,१६,९००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) घोडबंदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ते सी.एम.आय. कंपनीमार्फत नादुरुस्त झालेला असून ५५५.०० मीटर लांब व ९.०० मीटर रुंदीचा खडीकरण, ग्राऊटींग डांबरीकरण करावयाचा आहे. त्याकरीता रु. ६४,५१,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

त्यावरील तिन्ही रस्त्याच्या कामांकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना ही महासभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५६ :-**

विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ५९ :-**

१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे शितलनगर हा ६९०.०० मीटर लांबीचा व १८.०० मीटर रुंदीचा विकास आराखड्यातील रस्ता आहे. सदर रस्ता हा नादुरुस्त असून रस्त्यावर पावसाळ्यात पूर्णपणे पाणी साठत आहे. सदर रस्ता १० वर्षापूर्वी विकासकामार्फत तयार करण्यात आलेला आहे. तेव्हापासून फक्त दुरुस्ती कामे करण्यात येतात. सद्यस्थितीत भुयारी गटार योजने अंतर्गत रस्ता खोदल्याने रस्त्याच्या मधोमध ८.०० मीटर रुंदीचे खडीकरण व ग्राऊटींग करण्यात आलेले आहे. उर्वरीत रुंदीचा व डांबरीकरणाचा रस्ता तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु. ६८,४८,३००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

२) मिरारोड (पूर्व) सिनेमॅक्स ते रामदेव पार्ककडे जाणारा रस्ता हा ४०० मीटर लांब व १८.०० मीटर रुंदीचा आहे. सदर रस्ता भुयारी गटार योजने अंतर्गत खोदल्याने सद्यस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी ६.०० मीटर रुंदीचा खडीकरण व ग्राऊटींग करण्यात आलेले आहे. उर्वरीत रुंदीचा रस्ता खराब असून त्यावर खडीकरण व संपूर्ण रुंदीकरण डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता रु. ७२,१६,९००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

३) घोडबंदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ ते सी.एम.आय. कंपनीमार्फत नादुरुस्त झालेला असून ५५५.०० मीटर लांब व ९.०० मीटर रुंदीचा खडीकरण, ग्राऊटींग डांबरीकरण करावयाचा आहे. त्याकरीता रु. ६४,५१,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

त्यावरील तिन्ही रस्त्याच्या कामांकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना ही महासभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना

रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २०१०-११ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- |

सन २०११-१२ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे, तर शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकात महसुली (४) सानुग्रह अनुदान (दिवाळी) या लेखाशिर्षकाखाली एकूण १३.०० लाखाची तरतुद केलेली आहे. अशाप्रकारे एकूण १२३.०० लाखाच्या तरतुदीतुन महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी** | **कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००९-१०** | **सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००९-१०)** | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४१ | रु. ५८३०/- | ८४,०१,०३०/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९९ | रु. ५८३०/- | ११,६०,१७०/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना | २ | रु. ३६३०/- | ७,२६०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ८७ | रु. ३६३०/- | ३,१५,८१०/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ७ | रु. ११००/- | ७,७००/- |
| | | | **एकुण** | **९८,९१,९७०/-** |

वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. ९५.६२ लाख खर्च झालेला आहे. सन २०१०-११ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान गतवर्षाप्रमाणेच मंजुरी दिल्यास एकूण रक्कम ९८.९१ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिका अधिकारी / कर्मचाऱ्यांसह शिक्षकांस, संगणक चालक, लघुलेखक, बालवाडी शिक्षिका यांना दिवाळी निमित्त सन २०१०-११ साठी गतवर्षी प्रमाणेच सानुग्रह अनुदानास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

माझी सुचना आहे. अजून ५ टक्के वाढवून द्या.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील लावायचे धंदे बंद करा.

**मा. महापौर :-**

सुचना अमान्य करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

तुमची शिकवण आहे आम्हाला.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आमची सुचना घेतली की फेटाळली.

**अनिल सावंत :-**

फेटाळली.

**मा. महापौर :-**

बजेट नको का तिकडे कसाही ठराव करायचा का आपण?

**प्रकरण क्र. ५७ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६० :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य,

महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २०१०-११ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- |

सन २०११-१२ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे, तर शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकात महसुली (४) सानुग्रह अनुदान (दिवाळी) या लेखाशिर्षकाखाली एकूण १३.०० लाखाची तरतुद केलेली आहे. अशाप्रकारे एकूण १२३.०० लाखाच्या तरतुदीतुन महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी** | **कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००९-१०** | **सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००९-१०)** | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४१ | रु. ५८३०/- | ८४,०१,०३०/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९९ | रु. ५८३०/- | ११,६०,१७०/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना | २ | रु. ३६३०/- | ७,२६०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ८७ | रु. ३६३०/- | ३,१५,८१०/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ७ | रु. ११००/- | ७,७००/- |
| | | | **एकुण** | **९८,९१,९७०/-** |

वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. ९५.६२ लाख खर्च झालेला आहे. सन २०१०-११ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान गतवर्षाप्रमाणेच मंजुरी दिल्यास एकूण रक्कम ९८.९१ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिका अधिकारी / कर्मचाऱ्यांसह शिक्षकांस, संगणक चालक, लघुलेखक, बालवाडी शिक्षिका यांना दिवाळी निमित्त सन २०१०-११ साठी गतवर्षी प्रमाणेच सानुग्रह अनुदानास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५८, मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगपालिका प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा.महासभा दि.२०/०६/२००६, ठराव क्र.२९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र.मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्त्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाहीत. त्यामुळे संगणक चालकांचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहय मार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे, असे नमुद आहे. तद्नंतर मा.महासभा दि.२०/०३/२०१० ठराव क्र.६५ अन्वये संगणक चालक कम लिपीक / माहिती नोंदणीकार व लघुलेखक यांचा पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव मंजुरी करीता राज्य शासनास दि.१८/०८/२०१० रोजी पाठविला होता परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

मा. महासभा दि. २२/१२/२०१० ठराव क्र.६८ नुसार महापालिका मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६,५००/- तसेच लघुलेखक यांना रु.७,५००/- प्रति महिना ठोक मानधनावर दि. ३१/११/२०१० पासून पुढे ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आलेली असून सदरची मुदत दि. ३०/१०/२०११ रोजी संपत आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक यांची पदे मंजुर नाहीत. त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत संगणक चालक यांना रु.७,५००/- तसेच लघुलेखक यांना रु.८,५००/- प्रती महिना ठोक मानधनावर दि. ०१/११/२०११ पासून पुढे ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्सास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे. तसेच संगणक चालकांच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०६/२०१० रोजी पाठविला होता, त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही त्याचा पाठपुरावा चालु ठेवावा.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ५८ :-**

मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृत्तांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा.महासभा दि.२०/०६/२००६, ठराव क्र.२९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र.मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्त्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाहीत. त्यामुळे संगणक चालकांचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहय मार्गाने (Outsourcing) करुन घेणे अपेक्षित आहे, असे नमुद आहे. तद्नंतर मा.महासभा दि.२०/०३/२०१० ठराव क्र.६५ अन्वये संगणक चालक कम लिपीक / माहिती नोंदणीकार व लघुलेखक यांचा पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव मंजुरी करीता राज्य शासनास दि.१८/०८/२०१० रोजी पाठविला होता परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

मा. महासभा दि. २२/१२/२०१० ठराव क्र.६८ नुसार महापालिका मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६,५००/- तसेच लघुलेखक यांना रु.७,५००/- प्रति महिना ठोक मानधनावर दि. ३१/११/२०१० पासून पुढे ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आलेली असून सदरची मुदत दि. ३०/१०/२०११ रोजी संपत आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक यांची पदे मंजुर नाहीत. त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत संगणक चालक यांना रु.७,५००/- तसेच लघुलेखक यांना रु.८,५००/- प्रती महिना ठोक मानधनावर दि. ०१/११/२०११ पासून पुढे ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्सास ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडीत आहे. तसेच संगणक चालकांच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०६/२०१० रोजी पाठविला होता, त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही त्याचा पाठपुरावा चालु ठेवावा.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक २९/०९/२०११ रोजी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यात येत आहे. प्रकरण क्र. ५९, सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १९/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे चालणाऱ्या लॉजींग बोर्डींगबाबत.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, थोडक्यात विषय संपवणार आहे. ह्या विषयावर बरीच चर्चा झाली. बऱ्याच वेळा हा विषय सभागृहामध्ये आला. दुदैवाने सांगावेसे वाटते की, ज्याप्रमाणे सदस्याच्या भावना आहेत. त्याची काही कदर न करता. प्रशासन ह्या विषयाकडे गांभिर्याने पाहत नाही. १६ जानेवारी २००९ ला ह्या सभागृहामध्ये हा विषय आला. त्या विषयावर एक ठराव मांडला होता. लक्षवेधीव्दारे हा ठराव आला होता. शेवटची ओळ वाचतो. शहरात बार ॲण्ड परमिट रूम आणि लॉजिंग बोर्डिंगच्या आस्थापनाने ह्यावर नव्याने परवाने देण्यात येऊ नये त्याबाबत सभागृहाने एक मताने ठराव मंजूर करून धोरण निश्चित करावे व त्याप्रमाणे शासनास कळवावे तसेच मनपाने सुध्दा अशा अस्थापनाने नव्याने परवाने देण्यात येऊ नये. असा एक निर्णय घ्यावा हा एक निर्णय झाला. आणि त्याला सर्व सभागृहाने मान्यता दिली. त्यानंतर तत्कालीन महापौरांनी त्यावेळी निर्देश दिले होते. ह्यापुढे कुठलीही नवीन परवानगी देऊ नये. आपल्याकडे एन.ओ.सी. देऊ नये. आपली कुठली नविन एन.ओ.सी. देणार नाही. महापालिकेने त्याचे पाणी कनेक्शन तोडून टाकावे हे तत्कालीन महापौरांनी आदेश दिले होते. त्यावेळी ज्येष्ठ नगरसेविका प्रभात पाटील त्यांनी सांगितल होत की, ह्या लक्षवेधीचा निर्णय लागत नाही तो पर्यंत ह्या महासभेमधले कोणतेही विषय आम्ही चालवू देणार नाही. सर्वांनी सहकार्य करा. अशा प्रकारे ह्या ज्वलंत विषयावर चर्चा झाली. त्यापूर्वी ठाण्याचे पोलिस अधिक्षक त्यांनी १० मार्च २००८ ला नवल बजाज साहेब पोलिस अधिक्षक ठाणे ग्रामीण त्यांनी एक महापालिकेला एक पत्र पाठवले. एक सर्व्हे केला. ज्या घरांचा वापर फक्त राहण्य़ासाठी करणे आवश्यक आहे. अशा घरांची अंतर्गत रचना बदलून मसाज पार्लर किंवा इतर नावाखाली त्याचा वापर वेश्या व्यवसायासाठी केलेला आहे. त्यांनी रहिवाशीची अंतर्गत रचना बदल करून त्याचा वापर व्यवसायाकरता केलेला आहे. त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ आणि नियम एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम ५२,५३,५४,५५,५६ अन्वये कारवाई करावी. सोबत जोडलेल्या तक्त्यामधून लॉजेस, हॉटेल, बार आस्थापनाने रहिवासी ह्यांचे चालकावर त्वरीत कारवाई करून केलेला करारनामा आम्हास अवगत करावे हे नवल बजाज साहेबांनी पत्र पाठवले आणि पत्रावर पालिकेने काहीही कारवाई केली नाही. त्या पत्रासोबत त्यांनी मिरा भाईंदर मध्ये जे २४ अनाधिकृत लॉजिंग बोर्डींग आहेत त्याची यादी पाठवली होती. त्याची प्रत मी तुमच्या प्रशासनाकडून घेतली आहे. तर अगोदर त्या पत्रावर काय कारवाई केली ते सांगा.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, अनाधिकृत लॉजिंग बोर्डिंगच्या संदर्भात दि. १०/०३/२००८ च्या पत्रानंतर देखील संबंधीत यापूर्वीच ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक विश्वास नांगरे पाटील साहेबांनी सुध्दा नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मिटींग घेऊन ह्या अनाधिकृत लॉजिंग बोर्डिंगवर कारवाई करण्यास सांगितल होत. अशा एकूण कारवाईमध्ये १४ लॉजींग बोर्डिंग अनाधिकृत आहेत. आणि नाईट क्लब त्याच्यात लॉजींग बोर्डिंग आणि नाईट क्लब सुध्दा चाललेले आहेत. अशा १४ लॉजिंग बोर्डिंगची नाव महानगरपालिका प्रशासनातर्फे देण्यात आली. त्याच्यात मंथरा बार, रेड होर्स किंवा नाईट लाईट, बिग बॉस अशा प्रकारची सर्व बांधकाम हायवेला आहेत. त्याचप्रमाणे प्रभाग समिती क्र. २ च्या अखत्यारीतीत काही आहेत. १ आणि ४ मध्ये जवळपास नाहीच आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, अस बोलू नका. माझ्याइकडे १० ब्युटी पार्लर आहेत. त्याच्यात वेश्या व्यवसाय चालतो. मी आस्थापनाला पानपट्टे साहेबांना सांगायला गेलो. त्यांना ठरावाची माहीती नाही. ठराव झाला आहे हे त्यांना माहीत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. त्यांना कुठलाही परवाना आपण दिला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना दिली नाही. परंतु ठराव झाला हे तुम्हाला माहीत नाही. ते बोलतो मी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माहीती दिली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माहीती दिली नाही तर गाळे सिल करा ना. २० दिवसापूर्वी अल्पवयीन १४ मुली पकडल्या गेल्या. काय उत्तर आहे तुमच्याकडे. मी माझ्या दुकानाच लायसन्स काढल तुम्ही बंद करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बॉम्बे पोलिस अक्टप्रमाणे ती पोलिसांनी कारवाई करायची.

**मिलन म्हात्रे :-**

पोलिसाने संयुक्त करायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पोलिसांना आपण पत्र दिल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परवाना दिला नाही हे पोलिसांना कळवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पोलिसांना कळवल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मला ह्या शब्दात सांगितल ठराव कोणता झाला माहीत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो.

**मिलन म्हात्रे :-**

मी प्रशासनाशी अवगत आहे. मी तेच सांगतो. ह्या ठरावाचा काही उपयोग होत नाही. सन्मा. अनिल सावंत बोलतात ते बरोबर आहे.

**विजया वैती :-**

माझ्या वॉर्डामध्ये जे लॉजिंग बोर्डिंग आहे.

**सुधीर राऊत :-**

मॅडम माझ निवेदन पूर्ण होऊ द्या. मग तुम्ही बोला.

**विजया वैती :-**

गेल्या वेळेला जी लक्षवेधी होती त्याच्यात मी बोललेली अरसा रेसीडेन्शीअल जे अनाधिकृत बांधकाम आहे. प्लस त्याला परवाना रद्द केला. तरी तेथे व्यवसाय चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्यांचे निवेदन जे आहे. ती सगळी माहीती घेऊन मग द्यायची. त्यांना कसलीच माहीती नाही. मला पानपट्टे साहेब बोलले ठराव झाला हे मला माहीत नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब सन्मा. अनिल सावंत साहेबांनी जो विषय आणला तो महत्वाचा विषय आहे आणि त्याच गांर्भिय लक्षात घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लक्षवेधीवर चर्चा झाली होती. आणि लक्षवेधीवर ठराव होऊ शकत नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

हा विषय एवढा महत्वाचा आहे. ब्युटी पार्लर आणि वेश्या व्यवसाय या शहरात एवढा वाढला आहे की, भविष्यात हे शहर वेश्या व्यवसायासाठी प्रसिध्द होईल हे लक्षात घ्या.

**प्रभात पाटील :-**

पानपट्टे साहेब, बोलले लक्षवेधीवर चर्चा झाली. लक्षवेधीवर ठराव होऊ शकत नाही मान्य आहे. परंतु ती चर्चा वायफळ होती का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॅडम मी वायफळ अस बोललो नाही. ठराव झाला नव्हता.

**जुबेर इनामदार :-**

लक्षवेधीच्या नंतरसुध्दा तुम्ही परवाने दिले ना?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो साहेब.

**जुबेर इनामदार :-**

ह्याचा अर्थ तुम्ही त्याला कारणीभूत नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस.डी.ओ. ने परवानगी दिली.

**जुबेर इनामदार :-**

जो पर्यंत तुम्ही परवाने देत नाही .....

**भगवती शर्मा :-**

पानपट्टे साहेब, तस सांगू नका तुम्ही परवानगी दिलेली आहे. माझ्याकडे सगळ आहे. अनाधिकृत असताना तुम्ही परवानगी दिलेली आहे. तुमच्यावर आम्ही का कारवाई करू नये. महापौर साहेब आम्हाला उत्तर द्या.

**जुबेर इनामादार :-**

तुम्ही जो पर्यंत परवानगी देत नाही १३१ अधिनियम खाली मुंबई पोलिस अधिनियम अंतर्गत परमिशन मिळत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या सर्व ठिकाणी एस.डी.ओ. ने परवानगी दिलेली आहे. आपण ना हरकत दाखला दिला आहे. ज्या ठिकाणी बांधकाम परवानगी आहे. ते सर्व तपासून............

**भगवती शर्मा :-**

पानपट्टे साहेब आपने अनाधिकृत बांधकाम को भी परवानगी दि है। आप बोल ही नही सकते। मेरे पास प्रुफ है। बिल्डींग अनाधिकृत है। जिसके अंदर महागनरपालिकाने मेरे को लिखके दिया है। दि. २४/०३/२०११ को लिखके दिया है की, यहॉ के बावजूद भी आपने दि. १८/०४/२०११ को ना हरकत दाखला दिया है। किसपे कारवाई होगी आप बताओ मेरे को। एक तरफ लक्षवेधी के उपर ठराव किया जाता है। उसके उपरके अंदर में आपने कहॉ ताई ने कहॉ लक्षवेधी पे भी मा. महापौर का आदेश था। इसका मतलब आप मा. महापौर के आदेश था। इसका मतलब आप मा. महापौर के आदेश का पालन नही करते है। यह जिसने दिया है उसके उपर क्या कारवाई करेंगे मेरे को बताओ में बादमें प्रश्न करूंगा।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, पानपट्टे साहेब जे सांगतात ते अर्धसत्य आहे. लक्षवेधीवर ठराव होऊ शकत नाही. परंतु सुचनाचे पालन करायला पाहिजे असे संकेत आहेत. तत्कालीन महापौरांनी त्यावेळी सांगितल होत निर्देश आहे. प्रोसेडिंग आहे. सन्मा. सदस्य अनिल सावंत ह्यांनी जो ठराव मांडला होता तो ठराव न घेता मी सुचना म्हणून मी समाविष्ट करत आहे. सुचना म्हणून घेताना ह्यापुढे मा. आयुक्तांनी सुचनांचे पालन करायचे. ह्या गोष्टी केल्यानंतर लॉजिंग बोर्डिंग बंद होतील. हे मा. महापौरांनी त्यावेळी रूलिंग दिल आहे. त्यांना ते बंधनकारक आहे. १६ जानेवारीला ह्या सुचना दिल्यानंतर नवल बजाज साहेबांच २००८ ला त्याच लेटर आल्यावर सुध्दा ह्या प्रशासनाने २७ आस्थापनाला नविन परवाने दिले आहेत. तुम्हाला ह्या शहराची काय म्हणून ओळख करून द्यायची आहे. सकाळी आम्हाला एक अधिकारी भेटले होते त्यांनी सांगितल की, आम्ही मिरा भाईंदरमध्ये काम करतो हे सांगायला आम्हाला लाज वाटते. आम्ही सांगतो आम्ही ठाणे जिल्ह्यामध्ये काम करतो. प्रशासनाने २७ नविन परवाने कुठल्या आधारावर दिले.

**मा. महापौर :-**

हा विषय आणू. अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करायला पाहिजे. जी परवानगी दिली आहे ती सर्व रद्द करून द्यावी.

**अनिल सावंत :-**

२७ परवाने तुम्ही रद्द करणार आहात का? सर्व परवानग्या रद्द करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठराव झाल्यानंतर कशा परवानग्या दिल्या हा मोठा विषय आहे.

**मा. महापौर :-**

सर्व रद्द करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

रद्द करायचा वेगळा विषय आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, आपने लक्षवेधी में पहले भी रूलिंग दी है। कारवाई होती नही। इसके लिए मै आपसे चर्चा कर रहा हूॅ। आप आदेश दो उसका पालन होना चाहिए। इसके अंदर के अंदर में मेरे पास डॉक्युमेन्ट इन्होने कहॉ ठीक है। परवानगी दी है। वह अनाधिकृत है। मेरे पास भी सबुत है। उनके आधारपर बोल रहा हूॅ। २६ नव्हंबर मेस. ७/११ हॉटेल प्रायव्हेट लि. फाऊन्टन जवळ घोडबंदर यहॉपर इन्होने परवानगी दि है। २७/०४/२०११ को मैने वहॉपर माहीती के आधार पर पत्र दिया था। दि. २४/०३/२०११ को पत्र का जवाब दिया था। उसमें लिखा है। विकास कामे सद्यस्थिती इमारतीवर टेरेसवर सुमारे ३७ मीटर इनटु ६.५ मीटर मोजमापाचे टेरेस बंदिस्त केलेले आहे. सदर इमारतीचा वाणिज्य वापर सुरू असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जब की उसको रहिवासी परमिशन दिया था। तसेच रेखांकित भुखंडामध्ये सीआरझेड बाधित क्षेत्र २०० व २३८ x ४०५ याप्रमाणो पत्राशेड उभे केलेले आहेत. सदर शेडसाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही, ऐसे मेरे पास आठ मुद्दे थे। आठ मुद्दे के उपर श्री. शिवमुर्ती नाईक साहब का साईन किया हुआ

है। मेरे को यह जवाब देनेके अंदर में दिनांक १८/०४/२०११ उसपे भी शिवमुर्ती नाईक साहब के साईन है। और इन्होने नाहरकत दाखला दिया है। मेरे को पत्र देनेके बाद उसमे क्लिअर लिखा है। अनाधिकृत आहे. इसको ५३ की नोटीस दी है। उसकी भी कॉपी मेरे पास है। वॉर्ड ऑफिस ५३ की नोटीस देता है। उसके बावजुद परवानगी दि जा रही है। इसके उपर आप क्या कारवाई करेंगे। मा. महापौर साहब आप मेरे को जवाब दो। आपने दिया ना पत्र। और ५३ नोटीस है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब विषयाला अनुसरून आहे. साहेब, ह्या शहरामध्ये इंडस्ट्री होते तिथे किती बार झाले.

**भगवती शर्मा :-**

नलावडे साहब मेरा जवाब देने दो।

**मा. महापौर :-**

सगळ्यांना माहीत आहे आपण बसा.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, ह्या कुठल्याच बारवर किंवा व्हिडिओ सेंटरवर कुठेच कारवाई होत नाही. सन २००८ मध्ये लोकांनी व्हिडिओ सेंटर तोडलेले आहेत. चार नगरसेवकांवर कारवाई झाली. मा. महापौर साहेब, ह्या कुठल्याच बारवर किंवा व्हिडियो सेंटरवर कुठेच कारवाई होत नाही. सन २००८ मध्ये लोकांनी व्हिडिओ सेंटर तोडलेले आहेत. चार नगरसेवकावर कारवाई झाली.

**भगवती शर्मा :-**

मेरे को जवाब लेने दो।

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहातल्या सदस्यांना त्यांची मत मांडू द्या. तो विषय त्याच्याशी नाही. विषयाला सोडून बोलतात ते नंतर बोला. सभागृहातल्या महिलांच्या खास करून व्यथा काय आहेत त्या ऐकून घ्या. आज सर्वसामान्य नागरिकांना आणि महिलांना त्या रस्त्यावरून जायला हालत खराब होते. ते पहिल ऐकून घ्या. अतिक्रमण विभाग त्यांच्याकडेच आहे. ते काय करतात.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही जे अनुभवल आहे ते आम्ही बोलतो हे लॉजींग बोर्डिंग आणि व्हिडिओ पार्लर सगळे चालू आहेत इतकी लज्जास्पद गोष्ट आहे की, ह्या व्हिडिओ पार्लर आणि बी.पी.रोड वर होणार वारंग व्यवसाय वरून भा.ज.पा. पार्टीच्या चार नगरसेवकावर गुन्हा दाखल झाले. ते गुन्हे दाखल झाल्यानंतर आम्ही संजय केळकरजींच्या जोडीला नवल बजाज साहेब ह्यांच्याकडे गेलो असता नवल बजाजनी ही गोष्ट समजावून सांगितल्यानंतर एस.पी. नवल बजाजनी सांगितल हे चुकीच आहे. त्या नगरसेवकावर गुन्हे दाखल नाही करायला पाहिजे. त्यांनी इकडचे जे दोन अधिकारी आहेत त्यांच्या बदल्या केल्या. परंतु आपल्या महापालिकेला त्याच काही वाटले नाही. महापालिकेने त्याच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न केला नाही. नवल बजाज साहेब त्या स्टॅण्डींग कमिटीमध्ये दोन तास बसून............

**कल्पना म्हात्रे :-**

तत्कालीन महापौर नरेंद्र मेहता ह्यांनी गांर्भिय लक्षात घेतल आणि पोलिस आयुक्त, ट्राफिक पोलिस सर्व पक्षाचे गटनेते ह्या सगळयांना बोलवून एक मिटींग घेतली. त्या मिटींग मध्ये अस ठरवल गेल की, पोलिस कारवाई करतील त्यानंतर पालिका प्रशासन त्यावर कारवाई करेल. त्याचे लाईट कनेक्शन आणि नळ कनेक्शन कापले जातील.

**शरद पाटील :-**

महापालिकेने त्यावेळेला काही केल नाही. ज्यावेळेला पोलिसांनी कारवाई केली. त्यावेळेला महापालिकेने कसली कारवाई केली नाही. का केली नाही.

**मा.महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहतांनी हे काम केल आणि स्वतः .....

**(सभागृहात गोंधळ)**

**स्नेहा पांडे :-**

ऑब्जेक्शन लेनेवाला प्रशासन नही है। उनको भी लिगल हे इनलिगल है। उसकी मान्यता प्रशासन ही दे रही है।

**शरद पाटील :-**

एस.पी. साहेबांनी त्याची जाण लक्षात घेतली आणि सगळ करायला भाग पाडल.

**(सभागृहात गोंधळ )**

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही कोणाच्या तक्रारी काढत नाही. व्हिडिओ सेंटर एक माळ्याच होत ते दोन माळ्याचे झाले. आमच्यावर केस झाल्यानंतर महापालिका त्याच्यावर का कारवाई करत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदरच्या आजच्या ह्या विषयावर चर्चा झाली आहे. त्याची आपल्याला कल्पना आहे.

**शरद पाटील :-**

चर्चा चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आसिफ शेख साहेब, आपल्याला शरम वाटली पाहिजे दहिसरपर्यंत एकही लॉज नाही. दहिसरचा चेकनाका क्रॉस केला की, आपल्याकडे दिवाळीच आहे.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदरची एक ख्याती आहे की, आपण नगरपरिषदेपासून महानगरपालिके पर्यंत आपण आलेलो आहेत. आपल मिरा भाईंदर शहरासाठी ब्रिद वाक्य होत. निळे सागर हिरवे डोंगर शुभ्र मिठागर स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर ही ख्याती मिरा भाईंदरची होती.

**कल्पना म्हात्रे :-**

थोड्या दिवसात सुप्रसिध्द होईल.

**आसिफ शेख :-**

लॉजींग बोर्डिगला आपण ठराव झाल्यानंतर सुध्दा परवानगी दिली आहे. म्हणजे शहराची ख्याती पुरवण्याच काम प्रशासनामार्फत चाललेल आहे. खराब करण्याच काम प्रशासनामार्फत चाललेल आहे. खराब करण्याच काम प्रशासनामार्फत होत आहे. ज्यानी ह्या परवानग्या दिल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई करावी. सन्मा. भगवती शर्मा आमचे गटनेते ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. आणि मा. महापौर साहेबांनी सांगितल आहे. ह्याची कथनी वेगळी करनी वेगळी.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब हे सगळे पोटतिडकीने बोलतात त्याच्यावर प्रशासनाला सांगू द्या नक्की काय करणार आहेत. असेच ओरडले. निर्णय काय नाही झाला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या ठराव झाल्यानंतर ज्यांनी परवानगी दिलेली आहे. त्या अधिकाऱ्यांला सस्पेंड करा. ठराव मांडा ह्या ठिकाणी. उपमहापौर साहेब इडंस्ट्रीमध्ये बार झाले आहेत. खऱ्या इडंस्ट्रीवाल्याना हात घाला म्हंटले तर त्याचे नाकी दम येतो. बघा तुम्ही इंडस्ट्रीमध्ये किती बार झाले आहेत. शहराची ओळख काय झाली आहे. मा. महापौर साहेब हे जे लॉजींग बोर्डीग बार ह्यांना परवानगी महानगरपालिकेचे अधिकारी परस्पर देतात ती बारची परवानगी स्टॅण्डींग कमिटीकडे जाऊ द्या.

**प्रभात पाटील :-**

ह्या संपूर्ण परवानगीवर ज्यांच्या काऊन्टर सह्या आहेत त्या सगळ्यांना निलंबीत करा.

**दिनेश नलावडे :-**

तो पर्यंत या शहराचा विकास होणार नाही. महापौर साहेब, ह्याच्यावर कारवाई करा. संबंधित अधिकारी खोटी काम करणार नाहीत.

**मा. महापौर :-**

ह्या ठिकाणी मागच्या वेळेला ठराव झालेला असताना देखील परमिशन रद्द केली गेली नाहीत. त्या सर्व रद्द करण्यात याव्या आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, हे करा. फक्त बोलू नका. ह्याच्याकडून स्टेटमेन्ट घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून आपण ह्या महासभेत उपस्थित आहात. सन्मा. महापौरांनी रूलिंग दिलेल आहे. नव्या परवानग्या रद्द करा. आणि ज्यांनी परवानग्या दिल्या आहे. त्यांच्यावर कारवाई करा.

**शरद पाटील :-**

ते बंद करायचे तर लायसन्स फी आपण कशाला कमी केली.

**प्रभात पाटील :-**

आपण बोला माझ म्हणण नाही आहे. एक सेकंद मला बोलू द्या. सचिव साहेब तुमची ड्युटी आहे. आणि आजच्या ह्या सभेचे आयुक्त म्हणून तुमची ड्युटी आहे की, ह्याच्यापुढे मा. महापौरांनी जे जे आदेश दिले आहेत. त्याच पालन झाल नाही तर ह्याच्या पुढची महासभा लावण्यात येऊ नये. आम्ही तुमचे प्रस्ताव मान्य करणार नाही. तुमचे विषय इथे येता कामा नये. कारण मा. महापौरांच्या प्रत्येक आदेशाला प्रशासन केराची टोपली दाखवते. ह्यापुढे मा. महापौराच्या आदेशाच पालन आणि मगच महासभा.

**आसिफ शेख :-**

महासभेची तारीख निश्चित करताना अनुपालन अहवाल जो आहे तो महासभेच्या बरोबरच पाठवा. मग आम्हाला कळेल. महासभेला यायच की नाही. जर आदेशाच पालन झाल नसेल तर आम्ही महासभेला येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काही नगरसेवकांचे लॉजींग आहेत ना ते बंद झाले पाहीजेत. आपण तिकडून सुरूवात केली पाहीजे.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, फाटक रोडसे अभिनव स्कूल के बीचमें कमसे कम १०-१२ इललिगल लॉज बन रहे है। उसपे कारवाई की जाए।

**शरद पाटील :-**

त्या बारची लायसन फि कोणी कमी केली.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसेवकांचे लॉजींग बार बंद झाले पाहिजेत.

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. महापौराच्या परवानगीने त्यांनी आदेश दिले आहेत. मला एक निवेदन करायच आहे. कृपया आपण माझे दोन शब्द ऐकले तर बर होईल. सन २००९ च्या नंतर एकूण २७ लॉजींग बोर्डिंगची यादी समोर आहे.

**स्नेहा पांडे :-**

यादी पे कुछ कारवाई होती नही तो यादी का मतलब क्या है।

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

लॉजींग बोर्डींगच्या परवानगीचा विषय आहे. त्या एन.ओ.सी. देण्याचा जो विषय आहे. व्यवसाय करण्याचा विषय आहे हा सर्वप्रथम पोलिस डिपार्टमेन्टचा आहे. आणि सबडिव्हीजनल रजिस्टारचा आहे. एस.डी.ओ. कडून त्यांना परवानग्या दिल्या जातात. ती दिल्यानंतरच आपल्याकडे परवाना विभागाकडून ते कन्फर्म केल्यानंतर दिल जाते. त्यामुळे मा. महापौरांनी जे सांगितल आहे ते अधिकृतता आणि बाकीच्या सगळ्या गोष्टी तपासून ही जी २७ जणांची यादी आहे...............

**भगवती शर्मा :-**

आप दिशाभूल कर रहे है। महापालिकाके जिम्मेदारीसे आपको मुक्त कर रहे है। आप नाहरकत दाखला देते है। नाहरकत दाखला अनाधिकृत में कैसे देते है।

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

यह जो नाहरकत दाखला दिया है उसकी जॉच पडताल करेंगे वैसाही हम बोल रहे है। अगर गलत तरिकेसे दिया है। तो उसकी जॉच पडताल करने के बाद उसपे कारवाई करेंगे।

**भगवती शर्मा :-**

अभी तक क्या किया।

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

अभी तक नही किया। अब के बाद करेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकदम परफेक्ट उत्तर दिया।

**सुधिर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

उसके बारेमें उसकी जॉच पडताल करनेके बाद ही उसपे कारवाई हो सकती है। आणि लॉजींगचा बोर्डिंगचा विषय हा सब डिव्हीजनल मॅजेस्ट्रिटकडे आहे. ज्या लॉजींग बोर्डींगच्या व्यवसाया संदर्भात ज्या नगरसेवकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या किंवा ऑब्जरवेशनमध्ये अशा काही अनाधिकृत व्यवसाय चालू आहेत. जे प्रथम उद्योग आम्ही सब डिव्हीजनल मॅजिस्ट्रीटला कळवून त्याचे परवाने रद्द करू.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, राऊत साहेबांनी ज्या प्रकारे निवेदन दिल आहे. मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो की एकाही बारवर एकाही लॉजीग बोर्डींगवर कारवाई होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सगळं खोटं आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**दिनेश नलावडे :-**

परवानगी रद्द करा. अधिका-यानी ह्या शहराची वाट लावली आहे. आम्ही इकडे ओरडतो.

**मिलन म्हात्रे :-**

मुंबई हायकोर्टाने रस्त्याच्या वायडिंगच्या मध्ये सर्विस रोड मधले सर्व बियर बार लॉजींग तोडायची तुम्हाला ऑर्डर दिली आहे का? एक जनहित याचिका दाखल झाली होती. भाजपचे संजय यवले ह्यानी ती

दाखल केली होती. त्याच्यावर चार वर्षापूर्वी निकाल झाला. आता तिकडे वरती माळे चढायला लागले. त्या सर्विस रोडच्या मध्ये असलेल्या सगळ्या लॉजींग बोर्डींगवर त्याच उत्तर द्या.

**मर्लीन डिसा :-**

शितल नगरमध्ये हुक्का पार्लर आहे. तिथे सुध्दा कारवाई करा. सगळे एन्क्रोचमेंट केल आहे. मिरारोडला हाईड आऊट तरूण-तरूणी तेथे जातात. तिकडे बिझनेस चालू आहे. ड्रक्स एडिक्शन चालू आहे. अनाधिकृत आहे. तिकडे कारवाई करा.

**अनिल सावंत :-**

राऊत साहेब तुम्ही काय सांगितल की, हॉटेलचा परवाना देण्याचा विषय जिल्हाधिकाऱ्याकडे आहे. परंतु जिल्हा अधिकाऱ्याने किंवा पोलिसांनी जरी एन.ओ.सी. दिली असेल तरी त्या व्यवसाय धारकाला परवाना देणे महापालिकेला बंधनकारक नाही. महापालिकेने आपले काही नॉर्म्स पाळायचे असतात. प्रशासनाने परवाना देतेवेळी तुमचा जिल्हाधिकारी दाखला, उत्पादन शुल्क परवाना, पोलिस एन.ओ.सी., बांधकाम परवानगी सी.सी. आणि ओ.सी., कर पावती, करारनामा, सोसायटी असल्यास सोसायटीची एन.ओ.सी. एवढ्या कागदपत्राची तरी पुर्तता व्हायला पाहिजे. ओ.सी. म्हणजे तुमचा प्लान अप्रुव्हल पाहीजे. परंतु १६ जानेवारी नंतर ह्याच्या पुर्वीची तर अनाधिकृत आहेतच. १६ जानेवारी नंतर दिलेली जे परवाने आहेत त्याचे १०० टक्के आम्ही ७५ टक्के सुध्दा म्हणत नाही. २७ च्या २७ आस्थापनाने ह्याच्यातली १०० टक्के पुर्तता केली नाही. तरी सुध्दा त्यांना परवाने देण्यात आलेले आहेत. सर्व कागदपत्र माझ्याजवळ आलेले आहेत. त्यामुळे ही २७ आस्थापन बंद करण एवढाच त्याच्यावर मार्ग आहे. ह्या शहराची ओळख आम्हाला बियर बार किंवा लॉजींग बोर्डीगच शहर म्हणून करून घ्यायची नाही. उपमहापौर, मागच्या वेळेला ठाणे अधिक्षकांनी जी यादी दिली. त्याच्यावर ह्यांनी कारवाई केली. अधिक्षकांनी सरळ निर्देश दिले होते की, हे अनाधिकृत आहे ह्यांचे तुम्ही वॉटर कनेक्शन, इलेक्ट्रीक, एन.ओ.सी. सगळ रद्द करा. त्याप्रमाणे एक उदा. देतो ह्यांची कशी कारवाई होते. दि. ३०/०६/२००९ ला पोलिस अधिक्षकाच पत्र आल. त्या पत्राला अनुसरून भाईंदरमध्ये एक बार आहे. ओम साई गेस्ट हाऊस लॉजींग बोर्डीग त्याचा परवाना पालिकेने रद्द केला. कारण अनाधिकृत बांधकाम आहे. दि. ३०/०६/२००९ ला नोटीस बजावून आस्थापनेचा मिळकतीच्या बांधकामा बाबतची कागदपत्र आणि हा व्यवसाय परवाना रद्द करण्यात आलेला आहे. कारण त्या आस्थापनाला परवाना देताना ह्यांच्याकडे कुठलीही कागदपत्र नव्हती. ह्यांनी स्वतः काही केल नाहीच. परंतु पोलिस अधिक्षकांनी सांगितल्यानंतर ह्या एका गेस्ट हाऊसची त्यांनी कारवाई केली आणि परवाना रद्द करून टाकला, तो परवाना रद्द केल्यानंतर त्यांनी बांधकाम परवानगी कधीची आणली माहीत आहे. दि. ११/०८/७६ दि. ३०/०६/२००९ ला आपण परवानगी रद्द करतो. त्याच्या जवळ कागदपत्र नाही. बांधकाम परवानगी नाही म्हणून. आणि नंतर तो दि. ११/०८/१९७६ चा कागदपत्र सादर करतो. माझ्याजवळ ही परवानगी आहे. आणि त्याच्यानंतर त्याचा परवाना रेग्युलराईज्ड केला जातो. ही पध्दत आहे. म्हणजे प्रशासन त्यांना पळवाटा काढून देते. कारवाईच्या नावाखाली काहीतर पेपर बाजी करायची आणि पुन्हा तीच घाण ह्या शहरामध्ये चालू करायची. माझ्यामते त्यांनी जरी १०० टक्के कागदपत्राची पुर्तता केली असेल तरी ह्या शहरामध्ये ह्यापुढे लॉजीग बार्डीगसाठी परवाने देऊ नका. ह्या विषयाच गांभिर्य लक्षात घ्या.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आता ह्यानी एवढ्या पुराव्यानिशी हा विषय सभागृहामध्ये मांडला. आता अधिकाऱ्याकडून त्याची माहीती येऊ द्या की, तुम्ही नेमक काय केल. ते कळू द्या. सर्वांना तुम्ही बोलता आपणच ऐकतो. ते काय म्हणतात ते कळू द्या. आणि सन्मा. भगवती शर्मा हयांचा जो विषय आहे. त्या विषयावर खास निवेदन करू द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

७६ सालची परवानगी. हॉटेल कुठल आहे.

**अनिल सावंत :-**

ओम साई गेस्ट हाऊस लॉजींग बोर्डींग.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कुठे आहे.

**अनिल सावंत :-**

श्री. यशवंत कांगणे म्हणून मालक आहेत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

१९७६ साली भाईंदरमध्ये आले नव्हते.

**अनिल सावंत :-**

भाईंदर पूर्व नवघर रोड.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

राऊत साहेब हा अतिशय गंभीर विषय आहे. म्हणजे तुमचे अधिकारी काय करू शकतात त्याचा सबळ पुरावा आहे.

**भगवती शर्मा :-**

साहेब त्यांनी केले.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आणि ह्या विषयावर कोण अधिकारी करत असेल तर त्यांची सही वैगेरे बघून घ्या. मी तर सभागृहाला सांगतो की ह्या अधिकाऱ्यांना ह्या महापालिकेत राहायचा अधिकार नाही. ह्या मताशी मी ठाम आहे.

**भगवती शर्मा :-**

ठाम नाही. कारवाई करायला पाहीजे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी तेच म्हणतो.

**भगवती शर्मा :-**

वो फिर जाच पडताल करेंगे।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करा.

**भगवती शर्मा :-**

नगररचना विभाग भी है। विधी विभाग भी है। परवाना विभाग यहॉ पे है। उनको जवाब देने दो।

**आसिफ शेख :-**

एखादी एन.ओ.सी. देताना एकदा तुम्ही म्हणता रिपोर्ट प्रमाणे मान्य. कधी-कधी म्हणता लॉ विभागाचा अभिप्राय घ्या. कधी म्हणणार टाऊन प्लानींगचा अभिप्राय घ्या. तर ह्या प्रकरणात कोणाचा अभिप्राय घेतला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाच लोकांची समिती बसवा. पाच वर्षा नंतर अहवाल येईल. नंतर काम करू.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरानी जे वक्तव्य केल. त्याचा त्या ठरावामध्ये उल्लेख करा. कारण त्यांनी रूलिंग दिलेल नाही. त्यांनी लोंबत ठेवल आहे. त्यानी रूलिंग दिल पाहिजे. की हा अधिकारी राहायला नाही पाहिजे. असे माझे रूलिंग आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

रूलिंग आता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव निराळाच आहे. ठरावामध्ये उल्लेखीत असायला पाहिजे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हे सभागृहाचे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अहो दादा, दुर्दैव असे आहे आपण गोडदेव नवघरचे नागरिक आहोत. त्या रस्त्यावरुन चालताना आपल्याला शरम वाटते.

**अनिल सावंत :-**

प्रकरण क्र. ५९ चा ठराव टाईप करणे,

**मिलन म्हात्रे :-**

माझी ह्याच्यामध्ये सुचना आहे. मुंबई उच्च न्यायालयाने जो आदेश दिला आहे. रोड वायडिंगमध्ये जे लॉजींग बोर्डीग बनते. त्याची अंमलबजावणी का करण्यात आली नाही त्याला जबाबदार अधिकारी कोण? आदेश झाल्यानंतर त्याच्यावर परवानग्या कोणी दिल्या आहेत. त्याची चौकशी करून अधिकाऱ्यावर कारवाई करावी.

**मर्लिन डिसा :-**

साहेब, माझी सुचना घ्या. हुक्का पार्लर आणि ते डिस्को डान्स बार वगैरे आहेत ते इनलिगल आहेत.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब माझी सुचना घ्या. लॉजींग बोर्डीग सोबत व्हिडिओ सेंटर आहे. त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, लॉजींग बोर्डीग, ब्युटी पार्लर तसेच हुक्का पार्लर आहेत ते बंद करण्याचे आदेश देण्यात यावे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब माझी देखील सुचना त्याच्यात नमुद करा. हॉटेल स्विट ड्रिम मिरारोड स्टेशनसमोर लॉजींग बोर्डींग आहे. आणि रेड नाईट, रेड हाऊस बार चेकनाका हॉटेल मंथरा ते पेणकर पाड्यापर्यंत आणि दहिसर चेक नाक्यापासून ते वेर्स्टन हॉटेल पर्यंत जे बार आहेत ते अधिकृत आहेत की, अनाधिकृत आहेत. त्याची चौकशी करून ते अनाधिकृत असल्यास त्याचे परवाने रद्द करावे. अशी माझी सुचना त्याच्यात नमुद करा.

**अनिल सावंत :-**

राऊत साहेब ह्याच्यावर आता तुम्ही निवेदन द्या. कारवाई जी केली. कारवाई करणार आहात. मागे केलेली कारवाई पडताळून पाहणार आहात.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

लॉजींग बॉर्डींगबद्दल सर्व नगरसेवकाच्या भावना पहिल्यानंतर त्याच्या सर्वाच्या सुचना सहीत हा ठराव मंजुर करण्यात येत आहे. आणि प्रशासनाने याबाबत एकदम कडक धोरण स्विकारून ताबडतोब कारवाई करावी.

**मिलन म्हात्रे :-**

दादा आमच्या भावना नाहीत सुचना आहेत. सुचनांचा उल्लेख नाही केला.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. आपल्या आदेशावर येणाऱ्या महासभेमध्ये ह्या विषयीच्या कारवाईचा अहवाल प्रशासनाकडून आमच्यासमोर ठेवण्यात यावा.

**प्रकरण क्र. ५९**

सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १९/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे चालणाऱ्या लॉजींग बोर्डींगबाबत.

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे लॉजींग-बोर्डींग चालविण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. या संदर्भात मा. महासभा दि. १६/०१/२००९ मध्ये लक्षवेधीद्वारे चर्चा होऊन अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी व यानंतर शहरामध्ये लॉजींग-बोर्डींगचे परवाने देवू नयेत, असे सर्व सदस्यांच्या मते ठरविण्यात आले. तसेच तत्कालीन मा. महापौरांनी तसे आदेश दिले. तसेच मा. पोलीस अधिक्षक, भा.प्र.से. ठाणे ग्रामीण यांनी जावक क्र. अशाप/क्र.आर/४०५/वे.व्यवसाय/५१२-२००८, दि. १३/०३/२००८ या पत्राद्वारे लेखी स्वरुपात महापालिकेला अनधिकृत लॉजींग-बोर्डींगची (२४) यादी देऊन त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ आणि नियम (एम.आर.टी.पी.ॲक्ट) कलम ५२,५३,५४,५५ व ५६ अन्वये कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश दिलेत.

तरी सुध्दा महानगरपालिकेने अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कारवाई केलेली नाही. तसेच दि. १६/०१/२००९ नंतर २७ नवीन लॉजींग-बोर्डींगना नवीन परवाने दिले व परवाने देतेवेळी त्यातील बऱ्याचशा लॉजींग-बोर्डींग व्यवसायधारकांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर असुन शहरातील सामाजिक जीवन बिघडवणारी आहे. १६/०१/२००९ नंतरचे परवाने रद्द करावेत.

तरी अनधिकृत लॉजींग-बोर्डींग परवाना आस्थापनांवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी, त्यांचे परवाने रद्द करावेत. नळ जोडणी खंडीत करावी व रिलायन्स एनर्जीला वीज जोडणीसाठी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करावे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत अनुमोदक :- श्री. शफिक अहमद सादत खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मे. सेव्हन इलेवन हॉटेल्स प्रा. लि. यांना मनपा जा.क्र. मनपा/परवाना/२४/२०११-१२, दि. २७/०४/२०११ अन्वये दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व या हॉटेल्ससाठी दिलेला विद्युत पुरवठा व पाणी कनेक्शन त्वरीत काढून टाकावे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोड व भाईंदरमध्ये अनधिकृत हुक्का पार्लरचेही परवाने रद्द करण्यात यावेत व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त सुचनेत नमुद प्रस्ताव हा अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कायम स्वरुपी प्रतिबंधात्मक कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच श्री. सुरेश येवले यांनी मिरा भाईंदर शहराचा प्रमुख काशिमिरा गावाकडे जाणारा छत्रपती शिवाजी महाराज मार्ग या प्रमुख मार्गालगत असलेल्या दोन्ही बाजु असलेल्या नऊ (९) फुट रुंद रस्त्यावर नव्याने किंवा जुनी अतिक्रमणे कायमस्वरुपी तोडण्याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर दिलेल्या डिव्हीजनबेंच निर्णयाचे पालन करावे ही माझी सुचना आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. टेरी परेरा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

हॉटेल स्वीट ड्रीम मिरारोड स्टेशन समोरील लॉजींग-बोर्डींग, रेड नाईट व रेड हॉर्स बार, दहिसर चेकनाका हॉटेल मंथरा ते पेणकरपाडा पर्यंत असलेले लॉजींग-बोर्डींग तसेच काशिमिरा परिसरातील व वर्सोवा पर्यंत असलेले सर्व लॉजींग-बोर्डींग व बार अधिकृत किंवा अनधिकृत? याबाबत चौकशी करुन अनधिकृत असल्यास सदर लॉजींग-बोर्डींगवर तातडीने कारवाई करुन परवाना रद्द करावा.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. कल्पना म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर परिसरात बेकायदेशीर ब्ल्यु फिल्म सेंटर चालु आहेत, त्यावर त्वरीत कारवाई होऊन त्यांचे परवाने रद्द करावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६०, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक २२/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट जंक्शन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मारक उभारणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पू.) उड्डाणपुल येथील चौकास मा. महासभा दि. १९/१०/२००५ ठराव क्र. ५२ अन्वये ''स्वांतत्र्यवीर सावरकर चौक'' असे नाव देण्यात आलेले आहे. सदरचा चौक हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून अशा ठिकाणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून त्यांचे स्मारक उभारण्यात यावे. ज्यामुळे त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची, केलेल्या त्यागाची आठवण कायम लोकांच्या मनात जागृत राहिल.

अशा प्रकारच प्रस्ताव ह्याआधी प्रशासनाने आणण्यासाठी प्रयत्न केले परंतु, तो विषयपत्रिकेवर आला नाही. राष्ट्रपुरुषांचा पुतळा उभारण्यासाठी मा. जिल्हाधिकारी सो. ह्यांच्या अध्यक्षतेखाली समितीमार्फत शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन सामिती मार्फत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठवावा.

तरी स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून त्यांचे भव्य स्मारक भाईंदर (पूर्व) उड्डाण पुलाजवळ चौकात बनविण्यात यावी. व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असा मी ठराव मांडत आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा विषय अतिशय चांगला आहे. त्यांनी चांगल नाव सुचवल आहे. परंतु बजेटमध्ये प्रोव्हिजन नसल्यामुळे बजेटची प्रोव्हीजन करून पुढच्या बजेटच्या नंतर हा विषय प्रस्तावित होऊ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझा हा प्रस्ताव नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी ह्यांच्या विषयावर बोलतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब आपण काय रूलिंग दिल.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांची नावे संपूर्ण पंचकोशीतली हा प्रस्ताव पास झाला आहे. परंतु काम अजून झाल नाही. डॉ. आंबेडकराचा पुतळा लागला त्याच्या बरोबरचा हा प्रस्ताव आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आमचा ठराव आहे. तुम्ही रूलिंग कसे काय दिले. ह्या विषयावर ठराव आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या प्रस्तावावर ठराव आहे. श्री. मिलन म्हात्रे आपला विषय चांगला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने चार वर्ष काय केल.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

एकूण नावे किती आहेत. टेंडर काढायचे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठली.

**जयंत पाटील :-**

स्वातंत्र्य सैनिकाची नाव किती आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्याची नाव देऊन झाली. काम झाल ठराव ठेवला. प्रस्ताव पास झाला. चार वर्ष झाली. आपण आहात कुठे. आंबेडकराचा पुतळा जेव्हा बसला त्याच वेळेला तो ठराव पास झाला आहे. त्याची पुर्तता काय. स्वातंत्र सैनिक आपले पुर्वज आहेत सगळे. २८ लोकांची नाव दिली आहेत. प्रशासनाने ह्याच्यावर काय केल.

**अनिल सावंत :-**

शहरात सन्मा. स्वातंत्र्यसैनिक व मान्यवर सत्पुरुष, राष्ट्रपुरुष ह्यांचे पतुळे बसवणे किंवा स्मारके उभे करण्याविषयी अनेक नगरसेवक व विविध सेवा समित्या ह्यांकडून प्रस्ताव येत असतात. मागण्या होत असतात. आपल्या कार्यालयात तसा पत्रव्यवहार झाला असेल. शहरात राष्ट्रपुरुष, स्वातंत्र्यसैनिक ह्यांची स्मारके व्हायला हवीत. परंतु, त्याचबरोबर त्यांची देखभाल होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्यांची विटंबना होणार नाही ह्याची काळजी घेणे पण आवश्यक आहे. ह्याकरीता शहरात नगरसेवक व इतर संस्था ह्यांनी आणलेले प्रस्ताव एकत्र करुन ते सभेपुढे आणावे. तसेच स्मारकांची देखभाल व सुरक्षा ह्याच्यासाठीच्या उपाय योजना आखून, त्यासंबंधी कायदे/नियम बनवून सर्वसंपन्न प्रस्ताव मा. महासभेपुढे आणावा, असा मी ठराव मांडीत आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण त्याच्यावर रूलिंग दिल्यावर ठराव होऊ शकतो का?

**अनिल सावंत :-**

ह्यांनी सांगितलेना रूलिंग कुठे दिल आहे.

**शरद पाटील :-**

आपण ज्या विषयावर रूलिंग दिल त्या विषयावर ठराव होऊ शकतो का?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

का नाही होऊ शकत त्यानी ठराव मांडलाच नव्हता.

**शरद पाटील :-**

तुम्ही रूलिंग दिल ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांनी ठराव मांडला नव्हता. मला माहीत नाही की त्यांना ठराव मांडायचा आहे.

**शरद पाटील :-**

तुम्हाला माहीत नाही मग तुम्ही रूलिंग दिले कसे?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्हाला काय दिल रूलिंग?

**शरद पाटील :-**

काय दिल तुम्ही बघा. विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

मला माहीत आहे ना काय दिल ते.

**अनिल सावंत :-**

रूलिंग नाही दिल त्यांनी चर्चा केली आहे.

**शरद पाटील :-**

त्यांनी रूलिंग दिल. आपण सांगू नका चर्चा केली. तुमच्या सोयीप्रमाणे तुम्ही शब्द वापरू शकता.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

रूलिंग दिल की, बजेट प्रोव्हीजन नाही. हे रूलिंग दिल.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, रूलिंग दिल्यानंतर ठराव होऊ शकतो का? नियमात असेल तर आम्हाला सांगा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठराव झाल्यानंतर बजेट प्रोव्हिजन नाही एवढच फक्त बोललो.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. अनिल सावंत बोलले की, तुम्ही रूलिंग कशी दिली. ठराव माझ्या हातात आहे. हे वक्तव्य चुकीच आहे का?

**शरद पाटील :-**

मा. अनिल सावंतजी आपण फार अभ्यासू आहात. आपण हुशारही आहात. आपणच बोललात रूलिंग कशी देता.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौरांना कल्पना नव्हती ठराव आहे तो.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

सचिवांनी उत्तर द्यायचे की रूलिंग दिल्यानंतर ठराव होऊ शकतो का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हा जो स्वातंत्र्यवीर सावरकर चौकचा प्रस्ताव आहे. ह्या आधी महासभेसाठी दिलेला आहे. मागच्या तीन वर्षापासून आपल्याकडे प्रलंबीत आहे. आणि आता जो जी.आर. आलेला आहे त्याच्यात क्लियर उल्लेख आहे की, ९० दिवसामध्ये आपण प्रस्ताव महासभेपुढे आणला नाही. तर तो प्रस्ताव पास झाला म्हणून समजण्यात येईल म्हणून आपल्याकडे जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावाबद्दल सांगावे की आमच्याकडे प्रस्ताव आलेला नाही. सचिवांनी आपल्याकडे स्वातंत्र्यवीर सावरकरचा प्रस्ताव त्याला आपण अजेंठ्यामध्ये घेत नाही म्हणून हा 'ज' चा प्रस्ताव आम्ही आणलेला आहे. सचिव साहेब तुम्हाला प्रशासनाने महापौरांनी महासभेसाठी प्रस्ताव दिला की नाही.

**नगरसचिव :-**

प्रशासनाने मागे सगळे प्रस्ताव घेतले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग आतापर्यंत ह्या सभागृहामध्ये का आला नाही.

**मा. महापौर :-**

हा जो विषय आलेला आहे. त्यांचे दोन ठराव आलेले आहेत त्याचे ताबडतोब मतदान घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज तुम्ही सांगता अशी समिती करा. तुमच्याकडे प्रस्ताव आला आहे. प्रस्ताव आला नसता तर आम्ही सांगितल नसत. परंतु प्रस्ताव तुमच्याकडे आहे. तुम्ही त्यावेळेला सांगितले बजेटमध्ये प्रोव्हीजन नाही तर विषय संपला असता. परंतु स्वातंत्र्यवीर सावरकराचा पुतळा उभा करायचा नाही अशी तुमची इच्छा असेल नाहीतर तुम्ही महासभेत विषय घेतला असता. परंतु महासभेत तुम्ही विषय घेत नाही.

**मा. महापौर :-**

आमच्या मनात काय आहे ते तुम्ही सांगू शकता का?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही सांगता नियमानुसार सभा चालायला पाहिजे. मा. महापौरांनी रूलिंग दिल्यावर ठराव होऊ शकतो का? हा फक्त नियम आम्हाला सांगा.

**मा. महापौर :-**

ठराव झाला अस बोललो नाही. फक्त एवढ बोललो बजेटमध्ये तरतुद नाही.

**शरद पाटील :-**

त्यांनी रूलिंग दिल. अस काय बोलता तुम्ही साहेब आपण इथे नव्हता.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठराव मताला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण ६० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहीला ठराव सुचक सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल, अनुमोदन सन्मा. स्नेहा पांडे, दुसरा ठराव सुचक सन्मा. अनिल सावंत, अनुमोदक सन्मा. आसिफ शेख, अनुक्रमे दुसरा ठराव मी मतास टाकतो. शहरात सन्मा. स्वातंत्र्यसैनिक व मान्यवर सत्पुरुष, राष्ट्रपुरुष ह्यांचे पतुळे बसवणे किंवा स्मारके उभे करण्याविषयी अनेक नगरसेवक व विविध सेवा समित्या ह्यांकडून प्रस्ताव येत असतात. मागण्या होत असतात. आपल्या कार्यालयात तसा पत्रव्यवहार झाला असेल. शहरात राष्ट्रपुरुष, स्वातंत्र्यसैनिक ह्यांची स्मारके व्हायला हवीत. परंतु, त्याचबरोबर त्यांची देखभाल होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्यांची विटंबना होणार नाही ह्याची काळजी घेणे पण आवश्यक आहे. ह्याकरीता शहरात नगरसेवक व इतर संस्था ह्यांनी आणलेले प्रस्ताव एकत्र करुन ते सभेपुढे आणावे. तसेच स्मारकांची देखभाल व सुरक्षा ह्याच्यासाठीच्या उपाय योजना आखून, त्यासंबंधी कायदे/नियम बनवून सर्वसंपन्न प्रस्ताव मा. महासभेपुढे आणावा, असा मी ठराव मांडीत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पू.) उड्डाणपुल येथील चौकास मा. महासभा दि. १९/१०/२००५ ठराव क्र. ५२ अन्वये "स्वांतत्र्यवीर सावरकर चौक'' असे नाव देण्यात आलेले आहे. सदरचा चौक हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून अशा ठिकाणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून त्यांचे स्मारक उभारण्यात यावे. ज्यामुळे त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची, केलेल्या त्यागाची आठवण कायम लोकांच्या मनात जागृत राहिल.

अशा प्रकारच प्रस्ताव ह्याआधी प्रशासनाने आणण्यासाठी प्रयत्न केले परंतु, तो विषयपत्रिकेवर आला नाही. राष्ट्रपुरुषांचा पुतळा उभारण्यासाठी मा. जिल्हाधिकारी सो. ह्यांच्या अध्यक्षतेखाली समितीमार्फत शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन सामिती मार्फत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठवावा.

तरी स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून त्यांचे भव्य स्मारक भाईंदर (पूर्व) उड्डाण पुलाजवळ चौकात बनविण्यात यावी. व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे

**मा. महापौर :-**

अनिल सावंत ह्यांनी जो ठराव मांडला त्याच्या बाजूने ४४ मत आहेत आणि विरोधात जोठराव होता त्याच्या बाजूने १५ मत आहेत. सन्मा. सदस्य अनिल सावंत ह्यांचा ठराव बहूमताने पास झालेला आहे.

**प्रकरण क्र. ६० :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक २२/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट जंक्शन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मारक उभारणेबाबत.

**ठराव क्र. ६३ :-**

शहरात सन्मा. स्वातंत्र्यसैनिक व मान्यवर सत्पुरुष, राष्ट्रपुरुष ह्यांचे पतुळे बसवणे किंवा स्मारके उभे करण्याविषयी अनेक नगरसेवक व विविध सेवा समित्या ह्यांकडून प्रस्ताव येत असतात. मागण्या होत असतात. आपल्या कार्यालयात तसा पत्रव्यवहार झाला असेल. शहरात राष्ट्रपुरुष, स्वातंत्र्यसैनिक ह्यांची स्मारके व्हायला हवीत. परंतु, त्याचबरोबर त्यांची देखभाल होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्यांची विटंबना होणार नाही ह्याची काळजी घेणे पण आवश्यक आहे. ह्याकरीता शहरात नगरसेवक व इतर संस्था ह्यांनी आणलेले प्रस्ताव एकत्र करुन ते सभेपुढे आणावे. तसेच स्मारकांची देखभाल व सुरक्षा ह्याच्यासाठीच्या उपाय योजना आखून, त्यासंबंधी कायदे/नियम बनवून सर्वसंपन्न प्रस्ताव मा. महासभेपुढे आणावा, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | वर्षा गिरधर भानुशाली | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | सिंह मदन उदितनारायण | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | पाटील शरद केशव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १५ | मिलन वसंत म्हात्रे | |
| १६ | वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १७ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | | | |
| १८ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १९ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| २० | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २१ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २२ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलीम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३१ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३२ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३३ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३४ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३५ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३७ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३९ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ४० | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४१ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४२ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४३ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ४४ | टेरी पॉल परेरा | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक २२/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका क्षेत्रात नामकरण फलक लावणे व नामकरण केलेली नावांची दप्तरी नोंद घेणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांत महानगरपालिकेने वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. परंतु अद्यापपर्यंत सदर ठरावाची अंमलबजावणी पूर्णपणे झालेली नाही. रस्त्यांना व चौकांना दिलेल्या नावांच्या पाट्या त्या त्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे ज्यामुळे लोकांना त्याची माहिती घेऊन ती नावे दैनंदीन व्यवहारात प्रचलित होतील. त्यासाठी आवश्यक ती तरतुद अंदाजपत्रकात केलेली आहे.

तसेच महानगरपालिकेने महापालिकेच्या दप्तरी अशा सर्व नावांची नोंद घेणे आवश्यक आहे. महापालिकच्या मालमत्ता कराच्या बिलात, पाणीपट्टी बिलांत व पत्रव्यवहारामध्ये रस्त्यांच्या व चौकांच्या नावाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. महानगरपालिका ह्याबाबत उदासीन असल्यामुळे लोकांना देखील दिलेल्या नावांची माहिती होत नाही.  उदाहणार्थ १) भाईंदर (प) चौपाटीस श्री. साईबाबा चौपाटी असे नाव आहे, २) प्रभाग समिती क्र.१ कार्यालयास स्व. काका बाप्टीस्टा प्रभाग कार्यालय असे नाव आहे ३) प्रभाग समिती क्र. २ कार्यालयास डॉ. राजेंद्र प्रसाद असे नाव आहे. ४) प्रभाग समिती क्र. ३ कार्यालयास मोरेश्वर नारायण पाटील असे नाव आहे. ५) प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयास मौलाना अब्दुल कलाम असे नाव आहे. ६) नगरभवन कार्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन असे नाव आहे. अर्थी अनेक उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या विविध विभाग कामांचा गोषवारा/दप्तरी नोंद ही प्रचलित किंवा जून्या नावाने असल्याने महापालिकेने नामकरण केलेल्या महापुरुषांचा अनादर होत आहे.

तरी महानगरपालिकेने घोषित केलेल्या रस्ते व चौकांना नामकरणाच्या पाट्या तातडीने लावण्यात याव्यात तसेच यापूढे महानगरपालिकेच्या सर्व विभागाने मा. महासभेने मंजुर केलेली नावांची नोंद महापालिका रेकॉर्ड मध्ये घेवून सदर नावांचा उल्लेख करणेस सुरुवात करावी असा मी ठराव मांडत आहे.

**स्नेहा पांडे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, नगरसेवकांच्या संख्ये अभावी प्रभाग कार्यालय बदलतात. पूर्वी वेस्टला दोन प्रभाग कार्यालय होती.  १ नंबर आणि २ नंबर आणि वेस्टला ३ नंबर आणि मिरारोडच ४ नंबर होत.  आता वेस्टला एकच आहे. आणि भाईंदर पूर्वेला एकून ३ आहेत तसेच नाव पण बदलतील क्रमांक पण बदलतील. हा गोषवारा सविस्तर नाही.  ज्यांनी प्रस्ताव मांडला आहे तो चूकीचा आहे.

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजुर केले आहेत. महानगरपालिकेने कोणत्या रस्त्यांना, चौकांना, कार्यालयांना कोणती नावे दिली आहेत, ह्याबाबत सर्वच सभासदांना माहिती नाही. त्यामुळे सभासद एकाच नावाची अनेकदा मागणी करीत असतात. त्यामुळे प्रशासनास विनंती आहे की, महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत कोणत्या रस्त्यांना कोणते नाव दिले आहे, कोणत्या चौकाला कोणाचे नाव दिले आहे ह्याची संपूर्ण माहिती सभेपुढे ठेवण्यात यावी. त्यानंतर सभासदांचे नवीन नामकरणांचे प्रस्ताव स्विकारावेत. परिपूर्ण अशी माहिती सभागृहासमोर ठेवून नामफलकांची कार्यवाही करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या चौपाटीच नाव जे साईबाबा झोपडपट्टी ठेवले आहे ती जागा रेल्वेची आहे.

**शशिकांत भोईर :-**

अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दुसऱ्याच्या जागेवर आपण नामकरण करु शकत नाही. ते चुकीचे आहे. ते डिलीट करावे आणि रेल्वेकडे काय प्रस्ताव असेल तो पाठवावा. रेल्वेच्या जागेच आपण नामकरण कस करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, एक माहिती द्या. 'ज' चा जो प्रस्ताव आहे आता ते बोलले पास होणार. तो प्रशासनाने किती दिवसात आणायचा ह्याचा काय नियम आहे का?आता प्रस्ताव गेला तर सभागृहात आणायचा अस 'ज' च्या प्रस्तावाची नियमावली आहे का?

**नगरसचिव :-**

मंजुर झालेला ठराव प्रशासनाकडे जातो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासनाने किती दिवसात सभागृहात आणायला पाहिजे. कारण त्याच्यात उल्लेख केलेला आहे. प्रशासनाने पूर्ण माहितीसह आणाव कधी आणाव अस काय त्याच्यात आहे काय?

**नगरसचिव :-**

वेळ नाही दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वेळ नाही दिली तरी आपला नियम आहे की नाही? ते सांगावे नाहीतर तुम्ही आणणारच नाही.

**शरद पाटील :-**

त्यांना सांगा ना तुम्ही...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आता जो प्रस्ताव आलेला आहे याच्यावर असा दबाव आला आहे की, पूर्ण शहराची माहिती घेऊन हा विषय पून्हा सभागृहात आणावा. परंतु सभागृहात किती दिवसात येणार? प्रशासनाने तो प्रस्ताव किती दिवसात आणला पाहिजे. अस काही धोरण आहे की नाही?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, तो लवकरात लवकर आणा.

**नगरसचिव :-**

प्रकरण ६१ करिता दोन प्रस्ताव आले आहेत. पहिला प्रस्ताव सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा आहे. दुसरा प्रस्ताव सन्मा. एस.ए.खान ह्यांचा आहे. दुसरा ठराव वाचून मतदानास टाकतो मिरा भाईंदर महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजुर केले आहेत. महानगरपालिकेने कोणत्या रस्त्यांना, चौकांना, कार्यालयांना कोणती नावे दिली आहेत, ह्याबाबत सर्वच सभासदांना माहिती नाही. त्यामुळे सभासद एकाच नावाची अनेकदा मागणी करीत असतात. त्यामुळे प्रशासनास विनंती आहे की, महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत कोणत्या रस्त्यांना कोणते नाव दिले आहे, कोणत्या चौकाला कोणाचे नाव दिले आहे ह्याची संपूर्ण माहिती सभेपुढे ठेवण्यात यावी. त्यानंतर सभासदांचे नवीन नामकरणांचे प्रस्ताव स्विकारावेत. परिपूर्ण अशी माहिती सभागृहासमोर ठेवून नामफलकांची कार्यवाही करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना आहे. रेल्वेची जागा, एक्साइसची जागा, हायवेची जागा, ह्याच्यात तुम्हाला अधिकार नाही. हायवेच्या ह्याला संपूर्ण स्टेट गव्हरमेन्टला अधिकार आहे. उड्डाण पुलाला नाव द्यायचा अधिकार तुम्हाला नाही. रेल्वेच्या स्टेशनच नाव द्यायचा अधिकार रेल्वेला आहे. चौपाटीला साईबाबाच नाव लावल ते बेकायदेशीर

आहे. अशी मी त्याच्यावर सुचना मांडली. माझी सुचना तुम्ही उल्लेखीत नाही केली. रेल्वेच्या जागेवर तुम्ही नाव देऊ शकता का?

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांत महानगरपालिकेने वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. परंतु अद्यापपर्यंत सदर ठरावाची अंमलबजावणी पूर्णपणे झालेली नाही. रस्त्यांना व चौकांना दिलेल्या नावांच्या पाट्या त्या त्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे ज्यामुळे लोकांना त्याची माहिती घेऊन ती नावे दैनंदीन व्यवहारात प्रचलित होतील. त्यासाठी आवश्यक ती तरतुद अंदाजपत्रकात केलेली आहे.

तसेच महानगरपालिकेने महापालिकेच्या दप्तरी अशा सर्व नावांची नोंद घेणे आवश्यक आहे. महापालिकच्या मालमत्ता कराच्या बिलात, पाणीपट्टी बिलांत व पत्रव्यवहारामध्ये रस्त्यांच्या व चौकांच्या नावाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. महानगरपालिका ह्याबाबत उदासीन असल्यामुळे लोकांना देखील दिलेल्या नावांची माहिती होत नाही. उदाहणार्थ १) भाईंदर (प) चौपाटीस श्री. साईबाबा चौपाटी असे नाव आहे, २) प्रभाग समिती क्र.१ कार्यालयास स्व. काका बाप्टीस्टा प्रभाग कार्यालय असे नाव आहे ३) प्रभाग समिती क्र. २ कार्यालयास डॉ. राजेंद्र प्रसाद असे नाव आहे. ४) प्रभाग समिती क्र. ३ कार्यालयास मोरेश्वर नारायण पाटील असे नाव आहे. ५) प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयास मौलाना अब्दुल कलाम असे नाव आहे. ६) नगरभवन कार्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन असे नाव आहे. अर्थी अनेक उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या विविध विभाग कामांचा गोषवारा/दप्तरी नोंद ही प्रचलित किंवा जून्या नावाने असल्याने महापालिकेने नामकरण केलेल्या महापुरुषांचा अनादर होत आहे.

तरी महानगरपालिकेने घोषित केलेल्या रस्ते व चौकांना नामकरणाच्या पाट्या तातडीने लावण्यात याव्यात तसेच यापूढे महानगरपालिकेच्या सर्व विभागाने मा. महासभेने मंजुर केलेली नावांची नोंद महापालिका रेकॉर्ड मध्ये घेवून सदर नावांचा उल्लेख करणेस सुरुवात करावी असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

एस.ए.खान ह्यांनी जो ठराव मांडला होता. त्यांच्या बाजूने ४६ आहेत. आणि विरोधात १४ आहेत. आणि एक तटस्थ आहेत. बहुमताने ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. ६१ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक २२/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. –– महानगरपालिका क्षेत्रात नामकरण फलक लावणे व नामकरण केलेली नावांची दप्तरी नोंद घेणे.

**ठराव क्र. ६४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात वेळोवेळी रस्त्यांना व चौकांना नावे देण्याचे प्रस्ताव मंजुर केले आहेत. महानगरपालिकेने कोणत्या रस्त्यांना, चौकांना, कार्यालयांना कोणती नावे दिली आहेत, ह्याबाबत सर्वच सभासदांना माहिती नाही. त्यामुळे सभासद एकाच नावाची अनेकदा मागणी करीत असतात. त्यामुळे प्रशासनास विनंती आहे की, महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत कोणत्या रस्त्यांना कोणते नाव दिले आहे, कोणत्या चौकाला कोणाचे नाव दिले आहे ह्याची संपूर्ण माहिती सभेपुढे ठेवण्यात यावी. त्यानंतर सभासदांचे नवीन नामकरणांचे प्रस्ताव स्विकारावेत. परिपूर्ण अशी माहिती सभागृहासमोर ठेवून नामफलकांची कार्यवाही करण्यात यावी, असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | वर्षा गिरधर भानुशाली | मिलन वसंत म्हात्रे |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | सिंह मदन उदितनारायण | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | पाटील शरद केशव | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | सुनिता शशिकांत भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | वासुदेव भास्कर मुंज | | | |
| १७ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | | | |
| १८ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १९ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| २० | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २१ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २२ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २३ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलीम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३१ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| ३२ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३३ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३४ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३५ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३६ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३८ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ३९ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४१ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४२ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ४३ | टेरी पॉल परेरा | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, बरेच जाड-जाड पुडके आमच्या हातामध्ये दिले आहेत. मुंबई प्रांतिक अधिनियमामध्ये ब-याच काही सुधारणा झाल्या आहेत तर सर्व सदस्यांना त्याची कल्पना मिळाली पाहिजे. त्याच्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. तशी आपण सचिवांना सुचना करावी की लवकरात लवकर एक प्रशिक्षणाचा कार्यक्रम सर्व सदस्यासाठी लावावा.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब माझी सुचना आहे की, महापौर चषका खाली मॅराथॉनचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब आज ब-याच विषयावर चर्चा झाली. आणि ब-याच विषयावर रूलिंग दिल आहे. ह्याच्या अगोदरही आपण प्रशासनाला ब-याच वेळेला आदेश दिले की कुठे अनाधिकृत बांधकाम झाल. तसेच तुम्ही वेस्टला एका कमानीचे आदेश प्रशासनाला दिले होते. की कारवाई करा. त्याच्यावर आतापर्यंत कुठली कारवाई झाली नाही असे बरेच विषय आहेत. मग आज तुम्ही परत सांगितल आहे की, कारवाई करा तर पहील्या ज्या सुचना किंवा आदेश होते त्याची कारवाई अजून झाली नाही. कारवाई झाली की काय झाल त्या

विषयीची माहीती प्रशासनाने द्यावी. कारण ह्याच्यापूर्वी तात्काळ कारवाई करा अशा प्रकारचे प्रशासनाला निर्देश दिले होते त्याची काय अंमलबजावणी झाली त्याची माहीती प्रशासनाने द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझ्या हातामध्ये आजच्या मिटींगचा अनुपालन अहवाल आहे. साहेब आपला जो एक वर्षाचा कार्यकाळ झाला ना. त्याच्यात प्रशासनाच्या वतीने हा अनुपालन अहवाल दिला आहे. तो फक्त ह्याच मिटींगचा का? आपल्या पाच वर्षामध्ये काय-काय झाले किती पेन्डींग आहे ते सगळे दिले पाहिजे. चुकीचा अहवाल दिला आहे. अनुपालन अहवाल आज आपल्या हातात आहे. फक्त तीन प्रकरणाचा. बाकीच्या विषयाच काय. बाकीच्या मिटींग झाल्या त्या वैद्य नाहीत का? ह्याच्याबद्दल प्रशासनाने खुलासा करावा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आम्ही तुम्हाला विनंती केली ह्याच्यापूर्वी तुम्ही प्रशासनाला रूलिंग दिली आहे की ह्याच्यावर तात्काळ कारवाई करा. त्याची माहीती आम्ही मागतो तुम्ही द्यायला सांगत नाही.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यावर काय उत्तर होणार आहे तर मला सुध्दा बोलायच आहे. मला एवढच सांगायच आहे की, इथे दोन सदस्यांनी दोन सुचना मांडल्या. सन्मा. जुबेर इनामदार ह्यांनी सुचना मांडली की एवढा ग्रंथ आला आहे. त्याचा अभ्यास करायचा आहे. तर ते कुठेतरी थंड ठिकाणी निसर्ग रम्य ठिकाणी जाऊन प्रशिक्षण घेतल तर नगरसेवक येणाऱ्या निवडणुकीसाठी तरबेज होतील. तसेच फ्रेश आणि एकदम तज्ञ होऊन आम्ही सभागृहात येऊ. त्या प्रशिक्षणासंदर्भात त्याच्यावर उत्तर द्यावे आणि दुसरी सुचना खान साहेबांनी मांडली आहे की, महापौर चषक हे दोन्ही प्रश्नावर उत्तर आलेल नाही.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम गेल्या दोन वर्षात मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये कुठेही कला क्रिडा स्पर्धा आयोजित झालेली नाही. तरी हेमा भंगा म्हणून उत्तनची रहीवासी आहे. तीन गोल्ड पदक पटकावलेली आहेत. अशा लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण कला क्रिडा घेणे गरजेच आहे. आणि मॅराथॉन स्पर्धा ही करणे गरजेचे आहे. परंतु महापौराच्या कारकिर्दीत एकही स्पर्धा झालेली नाही. ह्या स्पर्धेच आयोजन ताबडतोब करावे. त्यामुळे खेळाडूंना आणि कलाकाराना प्रोत्साहन मिळेल. आपल्या मिरा भाईंदरच नाव हे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये नसून देशात आणि आंतरराष्ट्रीय देशामध्ये आपल नावलौकिक होईल आणि त्याकरीता आपण लवकरात लवकर ह्या स्पर्धाचे आयोजन कराव.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आम्ही विचारतो त्याच उत्तर देऊ नये अशी तुमची इच्छा आहे का? त्या कमानीच्या विषयावर सुध्दा तुम्ही सांगितल होत. तात्काळ कारवाई झाली पाहीजे. आता तुम्ही विचारतो तर तुम्ही वेळ लावता.

**दिपक खांबीत :-**

तत्कालीन आयुक्तांसमोर फाईल पुटअप केली होती. त्यावेळेस त्याच्यावर काय निर्णय झाला नाही. ती प्रत तशीच पडून राहिली. आता आजच्या सभेच्या अनुशंगाने ती फाईल मा. आयुक्ता समोर पुटअप करतो.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळेला तुम्ही दिलेल रूलिंग हे काय त्यांनी गंभीरपणाने घेतल नाही. तर अशा पध्दतीने का केल तर तुमच मत काय मांडणार. सभागृहातल्या सर्व सदस्याच मत हे असायला पाहिजे की, सभागृहामध्ये आपण बोबंलतो. सभागृहात सर्वजण मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. अस बोलू का म्हणून परवानगी घेतो. आम्ही बोलल्यावर आता तुमचा अंतिम निर्णय द्या अस बोलतो. आणि तो निर्णय दिल्यानंतर त्याच्यावर अंमलबजावणीच होत नसेल. अतिशय चिंताजनक बाब आहे. गंभीर आहे.

**मा. महापौर :-**

आपण जे ठराव करतो त्याची प्रशासन अधिकारी अंमलबजावणी करत नसतील तर आपल्याला प्रशासनापुढे जायचा अधिकार नाही. ह्या विषयाच पालन काटोकाट झाल पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

ठरावाची अंमलबजावणी बरोबर करतात. तुमच्या आदेशाची कार्यवाही होत नाही हा शब्द वापरा.

**मा. महापौर :-**

जो आदेश दिलेला आहे. बेकायदेशीर बांधकाम तोडण्याविषयी पहाणी करा अशी मी आपल्याला विनंती करतो. त्याचप्रमाणे या ठिकाणी सर्व नगरसेवकांना प्रशिक्षणासाठी जायचे आहे. त्या संदर्भात आपण लवकरात लवकर त्याची अंमलबजावणी करा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, किती दिवसामध्ये? करतो बोलले तर त्याची काही कालमर्यादा आहे की नाही?

**सुधीर राऊत ( मा. उपायुक्त (मु.) ):-**

मा. महापारांच्या परवानगीने बोलू इच्छितो. याच्या संदर्भात मा. आयुक्तांना त्वरित रिपोर्ट सादर केला जाईल. आणि मा. आयुक्तांच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**सुधीर राऊत (मा.उपायुक्त (मु.)) :-**

राज्य शासनातर्फे राज्यातील पूर्ण राज्यभर राबवण्याचे अभियान आहे. प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक शाळामधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबीबत विशेष पटपडताळणी मोहीम पूर्ण राज्यभर राबवणार आहोत. त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात २०२ प्राथमिक शाळा आहेत. आणि १३० माध्यमिक शाळा आहेत त्या सर्व शाळा मध्ये शासकिय अधिकाऱ्याची आणि कर्मचाऱ्याची पथक घेऊन पटपडताळणी कार्यक्रम राबवणार आहोत. डिसेंबर २०११ पूर्वी सर्व भारतभर सामाजिक, आर्थिक आणि जातीवर आधारीत जणगणना त्याच कामकाज सुरू झालेले आहे. आज आपले बहुतांशी कर्मचारी त्याच प्रशिक्षण घेत आहेत. या प्रशिक्षणा नंतर लवकरात लवकर जणगणनेचे काम सुरू होईल. माझी सर्व सभागृहाला आणि पदाधिकाऱ्यांना विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टोटल शाळा किती झाल्या?

**सुधीर राऊत (मा.उपायुक्त (मु.)) :-**

२०२ प्राथमिक आणि १३० माध्यमिक त्याच्यात सर्व आलेले आहे म्हणजे सेकंडरी आणि हायर सेकंडरी ह्या सर्व शाळामध्ये विशेष पट पडताळणी मोहीम ३ ते ५ ऑक्टोंबरला होणार आहे. आपल्या प्रभागात ज्या शाळा आहेत. त्याची शासकिय अधिकारी स्वतः पटपडताळणी करणार आहेत. त्याच्यामध्ये आपल सहकार्य असावे. दुसरी गोष्ट सामाजिक, आर्थिक आणि जातीवर आधारीत अशी जी जणगणना करायची आहे ती सुध्दा लवकरात लवकर सुरू होईल. त्याच्या प्रशिक्षणाचा दुसरे सत्र आजच संपले आहे. त्यानंतर जणगगणनेला सुरूवात होणार आहे. ह्या जणगणनेत हॅन्डल मशीन आणि टॅबलेट पी.सी वर सर्व नोंदवून घेतल जाणार आहे. संबंधीत नागरिकाकडून प्रतिज्ञापत्रक घेतले जाणार. त्याबाबतीत सुध्दा सहकार्य आवश्यक आहे. अशी मी प्रशासनातर्फे निवेदन करू इच्छितो.

**दिनेश नलावडे :-**

साहेब आपण ह्या सभागृहामध्ये बसतो. त्या सभागृहामध्ये बसतो. त्या सभागृहाच्या भिंती, कलर, गळती वैगेरे झाली आहे. चारही बाजूने बघा. पाच वर्ष झाली. ह्या सभागृहाची हालत बघा. आपण काही करत नाही. बजेट नाही का?

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, हेमा भंगा जो उत्तन की रहिवासी है। उन्होने तीन स्वर्णपदक जीते है। इसके मिरा भाईंदर शहर के लिए गौरव का विषय है। मिरा भाईंदर के प्रायव्हेट संस्थान है। जगह- जगह उनका सत्कार किया गया। लेकीन नगरपालिकाके तरफ से उसका सत्कार नही किया। नगरपालिकाके तरफसे महासभामें उसका सत्कार किया जाए।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब एक निवेदन करायचे आहे. मिरा भाईंदर मधील ६६ बिल्डींग अति धोकादायक आहेत. ह्याच्यात एक लता अपार्टमेंन्ट बिल्डींग होती. त्याच्यात २०८ फ्लॅट होते. ते २०८ फ्लॅटमधील सर्व लोक बेघर झाले आहेत. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने ट्रान्झीस्ट कॅम्पसाठी उपाययोजना करायला पाहिजे. अशा जर ६६ बिल्डींग रिकाम्या करायच्या असतील तर एका वेळी चार ते पाच हजार घरे लागतील. त्यासाठी चांगली उपाययोजना झाली पाहिजे. त्यासाठी आपण महापालिकेतर्फे, श्री. शरद पाटील यांनी आणलेला प्रस्ताव सविस्तर माहीतीनिशी जागा कुठे, खर्च कसा करायचा, कोण देणार याच्याबद्दल सर्व माहीतीनिशी हा विषय आला पाहीजे. त्याचप्रमाणे अशा ज्या दुःखद घटना होतात, लोक मृत होतात. त्या मृतांची संख्या सहा होती. ती जास्त वाढू नये याकरिता प्रशासनाने लवकरात लवकर उपाययोजना आखणे गरजेचे आहे.

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगला हा विषय रितसर आणण्यात येईल.

**प्रकरण क्र. -- :-**

सन्मा. सदस्य / अधिकारी / कर्मचारी यांचा प्रशिक्षण दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये बरेचशे बदल झालेले असुन या बदलांबाबत, महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त परिपत्रक, सभाशास्त्र नियम, घटना दुरस्ती बदल, पर्यावरण तसेच विकास नियमावलीमध्ये बदल याबाबतचे जी.आर./आदेश हे शासकीय भाषेमध्ये व इंग्रजीमध्ये असतात. यामुळे या जी.आर./आदेशांचा बोध सभासदांना होत नाही. कायदेविषयक माहिती याचा देखील अर्थ लागत नाही. याकरिता या सर्वांचे ज्ञान व मार्गदर्शन तज्ञ मार्गदर्शकाकडून होणे आवश्यक आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत अभ्यास दौऱ्याचे आयोजन केल्यास तज्ञ मार्गदर्शकांमार्फत शासनाकडील जी.आर./परिपत्रक/आदेशांबाबत ज्ञान व मार्गदर्शन प्राप्त होईल.

सन २०१२ मध्ये महापालिकेची सार्वत्रिक निवडणुक प्रस्तावित असल्याने या अभ्यास दौऱ्यातून सन्मा. सदस्यांना बरीचशी माहिती उपलब्ध होऊन ज्ञानात भर पडणार आहे व सभा कामकाजात त्याचा उपयोग होणार आहे.

तरी सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून पुढील कार्यवाही सचिव विभागामार्फत करण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी ह्यांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आणि आजची सभा संपली असे जाहीर करतो. धन्यवाद.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ३.१५ वाजता.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**